**शहराच्या मध्यवर्ती भागात नवीन फ्लॅट्स विकणे आहे**

विष्णुप्रिया हाईट्समध्ये पहिला मजला कमर्शिअल आहे. उर्वरित ४ रेसिडेंसिअल 2BHK फ्लॅट्स प्राईम लोकेशन सह विकणे आहे. (दोन महिन्यात ताबा)
पत्ता : दक्षिण कसबा, आनंद मंगल कार्यालयाजवळ, दाते गणपती मंदिराजवळ
मो. : ९८८१२४५०२७

एकाच १RK फक्त मुली/महिलाकरिता भाड्याने देणे आहे



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com






सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २३९ वा | गुरुवार, दि. ०१ मे २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# एकच रथ माघारी येणार, विजयाचा किंवा अंत्ययात्रेचा

## जरांगेंचं मुंबईत आंदोलन!



**जालना (कटूसत्य वृत्त):-** मराठा आरक्षण लढ्याचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत आंदोलन करण्याची घोषणा केली आहे. त्यांनी सरकारकडे पाच ते सहा मागण्या केल्या असून त्या २८ तारखेपर्यंत मागण्या मान्य झाल्या नाही तर २९ तारखेपासून मुंबईत आंदोलन होणार असून येताना एकतर विजयाचा रथ येईल किंवा अंत्ययात्रेचा; असा निर्धार जरांगेंनी बोलून दाखवला, ते बुधवारी माध्यमांशी बोलत होते.

जरांगे पाटील म्हणाले की, शिंदे समितीने चांगलं काम केलं,त्यांच्याकडून सरकारने काम करुन घेतलं. त्यामुळे सरकाराचं मी कौतुक केलं. ५८ लाख नोंदी सापडल्या आहेत, मात्र अधिकारी प्रमाणपत्र देत नाहीत. काही अधिकारी जातीयवाद करीत नाहीत. प्रमाणपत्र दिलं तर मुद्दामहून व्हॅलिडिटी दिली जात नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचं नुकसान होत आहे. एका मुलाचं ॲडमिशन रद्द झालं, त्यानंतर दोन-तीन दिवसात व्हॅलिडिटी मिळाली. हे सरकारचं षडयंत्र तर नाही ना?

ज्या नोंदी सापडल्या आहेत, त्याची माहिती ग्रामपंचायतीच्या फलकावर चिटकाव्यात.. गावात दवंडी देऊन माहिती द्यावी. त्या नोंदींवरुन तातडीने प्रमाणपत्र वाटप करायला सुरुवात करा. जिथल्या नोंदी असतील त्या ग्राह्य धरुन मराठ्यांना हक्क दिला पाहिजे. जर कुणी अधिकारी हलगर्जीपणा करीत असेल तर त्याला बडतर्फ करा, अशी माझी मुख्यमंत्र्यांकडे आहे.

मनोज जरांगे पुढे म्हणाले, दुसरी मागणी अशी की, मराठा आणि कुणबी एकच असल्याचा अध्यादेश काढा, कारण ५८ लाख नोंदी सापडलेल्या आहेत. तिसरी मागणी, सगेसोयऱ्याची अंमलबजावणी करा.. कारण ते सगळ्या जाती-धमार्साठी आहे. सगळ्या गोरगरीबांचे त्यामुळे कल्याण होणार आहे. सगळ्या जाती-धर्मातल्या मुलींना मोफत शिक्षण देण्याची मागणी आम्ही केली होती. त्यामुळे सर्व जातीच्या मुलींचं कल्याण झालं आहे.

चौथी मागणी, आमच्यावरच्या केसेस मागे घेतल्या जाव्यात. सरकारने शब्द दिला होता. पण आता ते विसरत आहेत. मराठ्यांनीच ही सत्ता मिळवून दिलेली आहे. जातीसाठी मी मरायला भीत नाही. मुंबईत त्यासाठीच येतोय, माज्यावर हल्ला करायचा प्लॅन असेल तर मीच मुंबईत येतोय. जे आंदोलन आंतरवलीत होणार आहे, तेच मुंबईतही होणार आहे. २९ ऑगस्टला हे आंदोलन होईल.

२८ ला मला सोडायला मुलं येतील त्यानंतर २९ तारखेला ते माघारी शेतीतली कामं करतील. माज्या मुलांना जराही धक्का लागला तर कुणाचीच खैर करणार नाही. मुंबईमध्ये मी शांततेत आंदोलन करणार आहे. २८ ऑगस्टच्या आत सगळ्या अंमलबजावण्या झाल्या पाहिजेत.

पुढची मागणी अशी की, हैदराबाद गॅझेट लागू करा. आमच्या संयमाचा अंत होत आहे. मुंबईत जाताना मी दोनच गोष्टी घेऊन जाणार आहे. एक विजयाचा रथ आणि दुसरा अंत्ययात्रेचा रथ. दोन्हीपैकी एक वापस येणार, हे फडणवीसांनी लक्षात ठेवावं, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे.

# 'उजनी'तील पाणीसाठा उणे १५ टक्क्यांवर

## शेतीच्या पाण्यासाठी शेतकऱ्यांचा संघर्ष



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** उजनी धरण सध्या उणे १५ टक्क्यांवर आले असून, धरणात सध्या ५५.७९ टीएमसी पाणी आहे. धरण उणे २५ टक्क्यांवर पोहोचल्यावर कालव्यातून पाणी सोडता येत नाही. त्यामुळे सध्या शेतीसाठी सोडलेले आवर्तन यंदाच्या हंगामातील शेवटचे असणार आहे. २५ मेपर्यंत हे आवर्तन सुरू राहणार आहे.

शेतीसाठी कालव्यातून 'टेल टू हेड' पाणी सोडण्यात आले आहे. कडक उन्हाच्या पार्श्वभूमीवर सध्याच्या आवर्तनाचे पाणी तीन-चार दिवसांतच बंद करून पुढील कालव्याला सोडले जात आहे. उजनीच्या पाण्यावर पिके केलेल्या शेतकऱ्यांनी आणखी काही दिवस पाणी सुरू राहण्याचा आग्रह धरला आहे. त्यासाठी रात्री १० नंतर अचानक पाणी बंद केले जात आहे.

धरणात जरी ५५ टीएमसीवर पाणी असले तरी आणखी पाच टीएमसी पाणी कमी झाल्यावर कालव्यातून शेतीसाठी पुरेशा वेगाने पाणी जात नाही. त्यामुळे आता अधिकारी घाईघाईत पाणी कमी कमी करीत 'हेड'कडे जात आहेत. आगामी काळात मेअखेर सोलापूर शहरासाठी भीमा नदीतून पाणी सोडावे लागणार आहे. त्यानंतर धरणातील उर्वरित पाणी पावसाळा सुरू होईपर्यंत पिण्यासाठी वापरावे लागणार आहे.

सध्या जिल्ह्यातील उपसा सिंचन योजनांची कामे सुरू असून, आगामी वर्षात ही कामे पूर्ण झाल्यावर धरणातील पाणी कालव्यातून शेतीसाठी सोडताना अधिकाऱ्यांना तारेवरील कसरत करावी लागणार आहे. सध्या लघू व मध्यम प्रकल्पातील पाणी देखील पिण्यासाठीच राखून ठेवले जात आहे.

### नदी अन 'उपसा सिंचन'चे पाणी बंद

भीमा नदीतून सोडलेले पाणी बंद करण्यात आले असून, सीना-माढा व दहिगाव उपसा सिंचन योजनांचे पाणी आता बंद करण्यात आले आहे. उन्हाचा तडाखा वाढल्याने बाष्पीभवन देखील वाढले आहे. अवकाळीमुळे पावसाळा लांबणीवर पडेल, असा अंदाज असल्याने कालव्यातून सोडलेल्या पाण्याचा विसर्ग देखील कमी करून आता २८७० क्यूसेक करण्यात आला आहे.

# सर्व विभाग व तालुका प्रमुख यांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून उडान उपक्रम यशस्वी करावा- जिल्हाधिकारी आशीर्वाद



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** उडान 2025 अंतर्गत प्रशासकीय कामात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यात येत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता( अक) कॉलिंग सेंटर द्वारे जिल्ह्यातील नागरिकांना फोन करून त्यांच्याकडून शासकीय योजनांच्या अनुषंगाने प्रश्न विचारून त्यांच्या विभागाकडे तक्रारी असतील तर त्याच्या डॅशबोर्डवर नोंदी घेतल्या जात आहे व त्या नोंदीच्या आधारे संबंधित तालुकाप्रमुख व विभाग प्रमुख त्यांच्या तक्रारीचे निवारण आठ दिवसात करतील. यातून संबंधित लाभार्थ्यांना शासकीय योजना व प्रशासकीय कामकाजचा लाभ गतिमान पद्धतीने मिळण्यास मदत होणार आहे. तरी सर्व संबंधित विभाग प्रमुख व तालुकाप्रमुख यांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून हा उपक्रम यशस्वी करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित उड्डाण 2025 अंतर्गत प्रशासनात अक वापर उद्घाटन तसेच प्रशिक्षण कार्यक्रम उद्घाटन प्रसंगी जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा चे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, मुख्य वित्त व लेखा अधिकारी मीनाक्षी वाकडे, समाज कल्याणच्या सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे, शिक्षणाधिकारी प्राथमिक कादर शेख, जिल्हा परिषद बांधकाम कार्यकारी अभियंता अभियंता नरेंद्र खराडे, महिला व बाल विकास विभागाचे जिल्हा कार्यक्रमाधिकारी प्रसाद मिरकले यांच्या सह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की प्राथमिक स्तरावर पुरवठा विभाग शिक्षण आरोग्य महिला व बालविकास व पशुसंवर्धन या पाच विभागाचा समावेश करण्यात आला असून या पाच विभागाच्या अनुषंगाने कॉलिंग सेंटर मार्फत दररोज 15 ते 20 हजार नागरिकांना मोबाईलवर फोन केले जात असून त्यातील सहा ते सात हजार कॉल वर नागरिक विचारलेला प्रश्नाचे उत्तरे देऊन संबंधित विभागाशी आपले मत मांडत आहे. त्यानुसार डॅशबोर्डवर माहिती तयार होत असून कोणत्या विभागाशी जास्त तक्रारी आहेत तसेच कोणत्या ठिकाणी काय करणे आवश्यक आहे याची माहिती प्रशासनाला उपलब्ध होत असून त्यावर पुढील उपाययोजना करून शासकीय योजनांचा लाभ तसेच प्रशासकीय कामकाज अत्यंत गतिमान व सुलभ पद्धतीने (पान 2 वर..)

# आठवड्यातून दोनदाच सोलापूर ते गोवा विमानसेवा




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर ते गोवादरम्यान २६ मेपासून फ्लाय ९१ या कंपनीच्यावतीने विमानसेवा सुरू केली जाणार आहे. कंपनीने तसा ई-मेला आम्हाला पाठविला असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

या विमानसेवेची तिकिटे साधारणतः दहा दिवस अगोदर म्हणजे १६ मेपासून विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत. सोमवार आणि शुक्रवार अशी आठवड्यात दोनदा सोलापूर ते गोवा आणि गोवा ते सोलापूर विमानसेवा असणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.


गोवा येथून सकाळी ७.२० वाजता विमान सोलापूरकडे निघणार आहे. सोलापुरातून सकाळी ८.५० वाजता हेच विमान परत गोव्याकडे जाणार असल्याची वेळ नियोजित केली आहे. सोलापूर ते गोवा आणि गोवा ते सोलापूर विमान प्रवासासाठी किती रुपयांचे तिकीट असणार आहे? याची माहिती मात्र विमान कंपनीने अद्याप दिलेली नाही. लवकरच ही माहिती देखील प्रसिद्ध केली जाणार आहे. २६ मेपासून होटगीरोड विमानतळावरून विमानसेवा सुरू करण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबींची पूर्तता करण्याचे काम सुरू आहे. होटगीरोड विमानतळावर विमानसेवेच्या दिवशी पोलिस मनुष्यबळ देण्याचाही निर्णय झालेला आहे.

सोलापूर-पुणे-मुंबई या हवाई मार्गावर विमानसेवा देण्यासाठी स्टार एअर कंपनीला निविदा मिळाली आहे. सोलापुरातील होटगीरोड विमानतळावर टू-सी या वर्गवारीतील विमान उतरू शकतात. स्टार कंपनीकडे मात्र असलेली सर्व विमाने ही थ्री-सी या वर्गवारीतील आहेत. त्यामुळे निविदा मिळूनही स्टार एअरकडून विमानसेवा सुरू झालेली नाही. होटगीरोड विमानतळावर उतरू शकतील, अशी विमाने जर स्टार एअरने सोलापूरच्या विमानसेवेतून माघार घ्यावी, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

या सूचनेनंतर स्टार एअर सोलापूरच्या विमानसेवेतून माघार घेण्याची शक्यता आहे. माघार घेतल्याचे पत्र अद्याप प्रशासनाला मिळालेले नाही. स्टार एअरने माघार घेतल्यास सोलापूर ते मुंबई या विमानसेवेसाठी फ्लाय ९१ कंपनीला नियुक्त केले जाऊ शकते. या कंपनीकडे तशी विमाने आहेत, डीजीसीएकडून विमानसेवेचा परवानाही फ्लाय ९१ कंपनीला मिळालेला आहे. जून अखेरपर्यंत सोलापूर ते मुंबई विमानसेवा सुरू होईल, असा अंदाज जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी व्यक्त केला आहे.







## संपादकीय

# आरक्षणातील उपवर्गीकरण

'आरक्षण हटवा' अशी आज मागणी होत आहे; पण आज आरक्षणाचा फायदा किती होतो हाही एक संशोधनाचाच विषय आहे. बऱ्याचदा उच्चवर्णीयही याचा फायदा घेतात, हे एक उघड सत्य आहे. गेले काही वर्षे दलित समाजाला घटनेने दिलेले 15 टक्के आरक्षण आणि ओबीसी समाजाला दिलेले 27 टक्के आरक्षण याबद्दल अनेक प्रकारची चर्चा सुरू आहे. यातील आरक्षणविरोधी शक्तींच्या मते आरक्षण मूळापासून रद्द केले पाहिजे. ही भूमिका फार कठोर आहे. आरक्षणाची टक्केवारी अबाधित ठेवत त्यात आता कालानुरूप बदल करण्याची वेळ आली आहे, अशी मांडणी करणाऱ्या अभ्यासकांची बाजू व्यवहार्य आहे.

अलीकडे आंध्र प्रदेश सरकारने 'आरक्षणांतर्गत आरक्षण' या प्रकारात काही ठोस निर्णय घेतले आहेत. 17 एप्रिल रोजी आंध्र प्रदेश सरकारने जाहीर केलेल्या निर्णयानुसार 59 जातींसाठी असलेल्या आरक्षणात आता तीन उपवर्ग करण्यात आले आहेत. 'अ' गटात दलित समाजातील बारा जातींचा समावेश करण्यात आला असून त्यांच्यासाठी 1 टक्का आरक्षण, 'ब' गटात अठरा जातींचा समावेश करण्यात आला असून त्यांच्यासाठी 6.5 टक्के आरक्षण तर 'क' गटात एकोणतीस जाती असून त्यांच्यासाठी 7.5 टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे.

हे तपशील बघितले की जाणवते की आंध्र प्रदेश सरकारने दलित समाजासाठी असलेले 15 टक्के आरक्षण अबाधित ठेवलेले आहे. यासाठी आंध्र प्रदेश सरकारने 15 एप्रिल या संबंधित वटहुकुमाचा तपशील पक्का केला. या वटहुकुमाला 16 एप्रिल रोजी आंध्र प्रदेशचे राज्यपाल एस. अब्दुल नजीर यांनी हिरवा कंदील दाखवला आणि आता सरकारचे आदेश जारी झाले आहेत. ही सर्व प्रक्रिया जवळपास एका वर्षापूर्वी सुरू झाली होती.

1 ऑगस्ट 2024 रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायमूर्तींच्या खंडपीठाने 'सहा विरूद्ध एक' असा निर्णय दिला. या निर्णयानुसार राज्य सरकारांना 'अनुसूचित जाती' आणि 'अनुसूचित जमाती'साठी असलेल्या आरक्षणात उपवर्गीकरण करता येईल. याचा आधार घेत आंध्र प्रदेशात सत्तेत असलेल्या तेलुगू देसम पक्षाच्या नेतृत्वाखालच्या 'राष्ट्रीय लोकशाही आघाडी' सरकारने 15 नोव्हेंबर 2024 रोजी एक सदस्यीय आयोग गठीत केला. यात माजी सनदी अधिकारी राजीव रंजन मिश्रा यांनी नेमणूक केली. या आयोगाने उपवर्गीकरणाबद्दल अहवाल द्यायचा होता. मिश्रा यांनी राज्याचा व्यापक दौरा केल्यानंतर 10 मार्च 2025 रोजी राज्य सरकारला अहवाल सादर केला.

या अहवालावर आंध्र प्र्रदेश विधानपरिषद आणि विधानसभेत विस्तृत चर्चा झाली आणि दोन्ही सभागृहात हा अहवाल एकमताने स्वीकारण्यात आला. आता जारी करण्यात आलेल्या आदेशाचा आधार म्हणजे हा एकमताने संमत झालेला ठराव. यातून 14 एप्रिल 2025 रोजी सरकारी गॅझेटमध्ये प्रसिद्ध झाला. असे उपवर्गीकरण करणारे भारतीय संघराज्यातील पहिले राज्य म्हणजे आंध्र प्रदेश ठरले आहे. आंध्र प्रदेश राज्याचा हा निर्णय क्रांतिकारक ठरणार आहे, याबद्दल शंका नसावी.

या संदर्भात पुन्हा एकदा आपल्याला आरक्षणाच्या धोरणाचा सैद्धांतिक पाया तपासला पाहिजे. हिंदू समाजाने दलित समाजाला शेकडो वर्षे ज्ञानापासून दूर ठेवले, त्यांचे आर्थिक शोषण केले. याबद्दल आपल्या समाजात जागरूकता आली ती एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात. याला महात्मा फुले व विसाव्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांचे प्रयत्न महत्त्वपूर्ण ठरले. दलितांच्या सर्वांगिण विकासासाठी शासनाने आरक्षणाचे धोरण मान्य करावे व दलितांना शैक्षणिक संस्थांमध्ये व सरकारी नोकऱ्यांमध्ये राखीव जागा द्याव्या, याबद्दल एकमत होते. छत्रपती शाहू महाराजांनी देशाला स्वातंत्र्य मिळण्याची वाट न बघता स्वतःच्या संस्थानात 1902 साली ब्राह्मणेतरांसाठी पन्नास टक्के आरक्षण लागू केले. भारत स्वतंत्र झाल्यानंतर घटना समितीत चर्चा होऊन 1952 साली अनुसूचित जाती व जमातींना आरक्षण लागू झाले.

गेली काही वर्षे आरक्षणाच्या धोरणाबद्दल दबक्या आवाजात यातील अन्यायाबद्दल चर्चा सुरू झाली. ही चर्चा एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला जोरात सुरू झाली. आज संरक्षणीमंत्रिपदावर असलेले राजनाथसिंग जेव्हा ऑक्टोबर 2000 ते मार्च 2002 दरम्यान उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री होते, तेव्हा त्यांनी 28 जून 2001 रोजी हुकूमसिंग यांच्या नेतृत्वाखाली एक समिती गठीत केली होती. हुकूमसिंग अध्यक्ष असलेल्या समितीचे उपाध्यक्ष होते रामपती शास्त्री व सचिव होते भा.प्र.से.तील ज्येष्ठ अधिकारी जे. पी. विश्वकर्मा. समितीच्या अहवालात स्पष्ट शब्दांत म्हटले होते की दलित समाजातील काही उपजातींना आरक्षणाचे जास्त फायदे मिळालेले आहेत.

म्हणूनच हुकूमसिंग समितीने अशी शिफारस केली होती की दलित समाजाचे दोन गटात विभाजन करावे. जास्त फायदे घेतलेला एक गट व कमी फायदे मिळालेला दुसरा गट. या विभाजनामागे साधा हेतू असा होता की आजपर्यंत ज्या उपजातींना कमी फायदे मिळालेले आहेत, त्यांना यापुढे न्याय्य प्रमाणात फायदे मिळतील. यात न सांगितलेले पण सरळ दिसणारे वास्तव म्हणजे दलित समाजातील काही पोटजातींना प्रमाणापेक्षा जास्त फायदे मिळाले आहेत. यावर काहीतरी उपाय केला पाहिजे, याबद्दल चर्चा सुरू झाली होती.

हुकूमसिंग समितीने 'उपवर्गीकरण' हा एक मार्ग सुचवला होता. पण या अहवालाच्या विरोधात तेव्हा मायावतींच्या बहुजन समाज पार्टीने व मुलायमसिंग यादव यांच्या समाजवादी पक्षाने उग्र निदर्शने केल्यामुळे राज्य सरकारला हुकूमसिंग समितीचा अहवाल बासनात बांधून ठेवावा लागला. त्या काळी दलित समाजातच आरक्षणाच्या धोरणाची न्याय्य अंमलबजावणी होत नसल्यामुळे राजनाथसिंग सरकारने एक उपाय करण्याचा प्रयत्न केला होता.

या घटनेला आता 23 वर्षे झाली आहेत. 23 वर्षात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. म्हणूनच आता आंध्र प्रदेशच्या विधानसभा आणि विधानपरिषदेने उपवर्गीकरणाबद्दल एकमताने ठराव संमत केलेला आहे. याबद्दल आंध्र प्रदेश राज्यात गेले अनेक महिने चर्चा सुरू होती. माडीगा समाजाचे नेते मंडा कृष्णा माडीगा यांच्या संघटनेने उपवर्गीकरणाला नेहमी पाठिंबा दिला होता. आंध्र प्रदेशातल्या दलित समाजातील दोन महत्त्वाच्या आणि मोठ्या उपजाती म्हणजे माडीगा आणि माला. माडीगा या उपजातींच्या नेत्यांचे असे नेहमी म्हणणे असायचे की माला या उपजातीला आरक्षणाचे जास्त फायदे मिळाले आहेत. ही वस्तुस्थिती समोर ठेवत आंध्र प्रदेश सरकारने नवा वटहुकुम लागू केला आहे. आता देशातील इतर राज्यांना या दिशेने पावलं उचलावी लागतील.

**प्रबोधन**

# मुजरा प्रथम । माझा महाराष्ट्र

भारताच्या आधुनिक इतिहासात महाराष्ट्र दिन १ मे १९६० पासून सुरू होत असला, तरी खरा महाराष्ट्र दिन सतराव्या शतकात युगपुरुष छत्रपती शिवरायांनी जेव्हा राज्याभिषेक करवून घेतला, त्या ६ जून १६७४पासूनच मानला गेला पाहिजे. छत्रपती शिवरायांच्या काळापासून सगळा मराठी भाषिक माणूस मराठा तितुका मेळवावा ह्या एका सूत्रात बांधला गेला; तो आजपर्यंत मराठी अभिमानाशी, मराठी अस्मितेशी, मराठी वीरतेशी एकरूप होऊन गेला आहे. छत्रपती शिवराय, शिवपुत्र छत्रपती संभाजीराजे, छत्रपती महाराणी ताराराणी यांच्या इतिहासाने जी राष्ट्रभावना निर्माण केली, ती असामान्य होती. कारण माँसाहेब जिजाऊंनी त्या परमपवित्र देशनिष्ठेचा भक्कम पाया घातला होता. म्हणूनच तर आजही जय जिजाऊ या शब्दाला अभिवादनमूल्य प्राप्त झालं आहे. काळाच्या कठोर परीक्षेत माता जिजाऊंच्या कार्याचा टिकाऊपणा सिद्ध झाला. छत्रपती संभाजीराजाच्या मृत्यूनंतर आठ-दहा वर्षं स्वराज्याला कोणताही नेता नसताना ते टिकवलं धनाजी जाधव आणि संताजी घोरपड्यांसारख्या रणमर्दानी. मराठ्यांच्या इतिहासाने घडवलेला हा पराक्रम एक जागतिक चमत्कार होता.

कवी वसंत बापट म्हणतात,
भव्य हिमालय तुमचा अमुचा,
केवळ माझा सह्यकडा ।
गौरीशंकर उभ्या जगाचा,
मनात पुजीन रायगडा ॥

यातील प्रत्येक शब्दाशब्दांतून कवीला रामायण-महाभारतापेक्षा छत्रपती शिवरायांची कार्यकीर्ती आनंदित करते म्हणूनच ते महाराष्ट्र असा दिव्य होता, तेजस्वी होता. महाराष्ट्र असा दिव्य होता, तेजस्वी होता. छत्रपतीची वीरकहाणी निधान माज्या हर्षाचे। असं उल्हासाने म्हणतात ते त्याचसाठी! पण आज महाराष्ट्राची कीर्तिध्वजा संतमहंतांच्या चरित्रांवर, वाङ्मयावर, काल्पनिक चमत्कारांवर, भक्तीमुक्तीच्या थापांवर, अलौकिक घटनांवर उभी असल्याचं सांगणाऱ्या धंदेवाईक बडव्यांची संख्या मोठी आहे. संतांनी मुक्तीची पेठ वसवली हे खरं, पण अंधश्रद्धेचा बाजार मोडला हे का सांगितलं जात नाही? संत साहित्यातील बुद्धिप्रामाण्यवाद लपवून ठेवणाऱ्या प्रवृत्ती महाराष्ट्राच्या नाशाला कारणीभूत होत आहेत. माझे लेखी देव मेला । असो त्याला असेल- म्हणणारे आणि आहे देव अशी वदवावी वाणी । नाही असे मनी समजावे अशी तुकोबांनी घेतलेली निरीश्वरवादी भूमिका सर्वांना मान्य झाल्यास अंधश्रद्धा निर्मूलन विधेयक ऊर्फ जादूटोणाविरोधी विधेयक मंजूर करण्याची जाऊ देत; सादर करण्याचीही आवश्यकता उरणार नाही.

छत्रपती शिवरायांना जाणता राजा म्हटलं जातं. आदर्श राज्यकर्त्याचं एवढं ढळढळीत उदाहरण छत्रपती शिवरायांच्या कार्याच्या, विचारांच्या रूपाने समोर असताना रयतेच्या हालअपेष्टांना पारावर नसावा, हे किती खेदजनक आहे? आजच्या राज्यकर्त्यांना प्रजारक्षक म्हणण्याऐवजी प्रजाभक्षक का म्हणू नये? प्रश्न पिण्याच्या पाण्याचा असो किंवा शेतीला पाणी पुरवण्याचा असो, रेशन धान्याचा असो वा शिक्षणाचा असो, राज्यकर्ते खुशाल आणि नागरिक बेहाल असं चित्र सर्वत्र दिसतं. यावर्षीचा दुष्काळ अभूतपूर्व आहे, पण त्याहून अधिक अभूतपूर्व आहे राज्यकर्त्यांच्या इच्छाशक्तीचा अभाव! उद्योगपती, बिल्डर्स, अधिकारी, श्रीमंत आणि राज्यकर्ते सर्वांमध्ये जनतेची लूट करण्याची एवढी अहमहमिका स्पष्ट दिसावी आणि पीडितांनी आपली मनगटेच चावत बसावं, असं हे राज्यव्यापी, देशव्यापी चित्र पाहावं लागत आहे. छत्रपती शिवरायांनी अशा गुन्हेगारांना हत्तीच्या पायी दिलं असतं. हजारो कोटींचे भ्रष्टाचार उघडकीला येताहेत. पण त्याविषयी कोणाला खेद ना खंत! शिवरायांनी सुराज्याचं तंत्र स्वकष्टातून निर्माण केलं होतं, पण आज सर्वच आमदार-खासदारांनी भ्रष्टाचाराचं तंत्र एवढं विकसित केलं आहे की भल्याभल्यांची मती गुंग व्हावी! अशा परिस्थितीत महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा, असं तारस्वरात गाणारा कलावंत आणि त्या तालावर माना डोलावणारे जनसामान्य, हे सारेच रोम जळत असताना फिडेल वाजवणाऱ्या निरोराजाचे वंशजच वाटतात.

म्हणजे आपण महाराष्ट्राशी असलेलं आपलं नातं तोडणार आहोत काय? घरात ढेकूण झाले म्हणून श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी घराला आग लावल्याची कथा लिहिली होती. तो विनोद होता. वास्तवात तसं कुणी करीत नाही. आपल्या मनाला शंभर टक्के आवडेल, असा देश फक्त कल्पनेतच असू शकतो. म्हणून दोषपूर्ण असला, तरी महाराष्ट्र आपलाच आहे. आपण आपल्या कुवतीनुसार आपला परिसर; आपलं कार्यक्षेत्र जरी सुधारू शकलो, तरी खूप झालं!

महाराष्ट्र माझा म्हटल्याशिवाय जिव्हाळा कसा वाढणार? टिकणार? कवी बापटांना महाराष्ट्राचे दोष माहिती नव्हते काय? तरीही त्यांनी सह्यकड्यावर प्रेम केलं. रायगडाची पूजा केली. कभिन्न कातळ, तुकड्याची गाथा, नामदेवाचे कीर्तन, दत्ताजींचा बाणेदारपणा, होनाजींची लावणी, कडकडून वाजणारा शाहिराचा डफ, वीररसपूर्ण पोवाडा, या महाराष्ट्राच्या साऱ्या वैशिष्ट्यांशी जिव्हाळ्याने जोडून घेतलं. या जुन्या संस्कृतीशी नव्या संस्कृतीशी नाळ जोडणं कठीण नाही.

थोर विचारवंत स.ज. भागवत म्हणतात, 'नव्या महाराष्ट्राने जीवनाची नवी निष्ठा समाजाच्या सर्व व्यवहारात दाखल केली पाहिजे. जातिविहीन समाज हे नव्या महाराष्ट्राचं ब्रीदवाक्य केलं पाहिजे.' व्यक्तिस्वातंत्र्य, बुद्धिप्रामाण्य, प्रयोगपरता यांचं रोपण नवसमाज- निर्मितीसाठी उपयुक्त आहे. विज्ञानाच्या, तंत्रज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्राला प्रत्येकाने गवसणी घालण्याचा अविरत प्रयत्न करून नवा महाराष्ट्र घडवणं मुळीच अशक्य नाही. प्राचार्य भागवतांच्या मते, 'वर्गहीन समाजरचना निर्माण करण्याची घोषणा नव महाराष्ट्र निर्मितीसाठी प्रामुख्याने असली पाहिजे.'

महाराष्ट्राला जिजाऊ माँसाहेबांनी स्वातंत्र्यप्रेम शिकवलं, छत्रपती शिवरायांनी प्रजापालन शिकवलं, महात्मा फुले यांनी ज्ञाननिष्ठा सांगितली. छत्रपती शाहूंनी बहुजनांचा वर्ण्यवर्चस्वाखाली दबलेला स्वाभिमान जागा केला. डॉ. आंबेडकरांनी अन्यायाविरुद्ध विद्रोह केला. असा हा महाराष्ट्र आजच्या अराजकसदृश परिस्थितीचा चक्रव्यूह भेदून प्रगतिपथावर गतिमान होईल यात शंका नाही. पण त्यासाठी 'माझा महाराष्ट्र' म्हणताना तो घडवणाऱ्यांचं जीवनकार्य प्रेरणास्थानी असावं. ते असं-

जाणत्या राजाचा । माझा महाराष्ट्र
माझा महाराष्ट्र । जिजाऊंचा ॥१
माझा महाराष्ट्र । वीर संभाजीचा
शूर ताराऊंचा । भद्रकाली ॥२
माझा महाराष्ट्र । महात्मा फुल्यांचा
समाजोद्धारकाचा । लोकभक्त ॥३
माझा महाराष्ट्र । राजर्षी शाहूंचा
दीन-दुबळ्यांचा । हितकर्ता ॥४
माझा महाराष्ट्र । थोर तुकोबांचा
शब्दांच्या शस्त्रांचा । जाणकार ॥५
लोकसंत थोर । गाडगेबाबा
महाराष्ट्र भूमी । धन्य केली ॥६
माझा महाराष्ट्र । भक्त समतेचा
धडा ममतेचा । सर्वा देतो ॥७
मुजरा प्रथम । माझा महाराष्ट्र
वंदी अन्य राष्ट्रा । नंतर मी ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

**प्रबोधन**

# माझा महाराष्ट्र । धन्य शिवभूमी

तुम्हाला कोणतं महाराष्ट्रगीत आवडतं, असा प्रश्न विचारण्याइतकी महाराष्ट्रगीतांची संख्या आज वाढली आहे. शिवाय १ मे २०१० रोजी महाराष्ट्र राज्याच्या सुवर्णजयंतीचा मुहूर्त साधण्यासाठी तर आणखी काही महाराष्ट्रगीतांची त्यांच्यात भर पडेल हे चांगलंच आहे. पण अशा गौरवगीत लेखन-गायनात यांत्रिकपणा नसावा. तसंच त्यातील भावभक्ती हीदेखील विशिष्ट हंगामापुरतीच मर्यादित नसावी.

'कवी वेडे असतात' असं नाटककार शेक्सपियर म्हणाले. कारण कवींमध्ये भावसमृद्धी असते, पण वैचारिक प्रगल्भता नसते. महाराष्ट्राचं भावपूर्ण चित्र वेगळं आणि बुद्धिनिष्ठ वेगळं, असा फरक त्याचसाठी विवेकवादी करीत असतात. पूर्वीचा महाराष्ट्र, कालचा महाराष्ट्र आणि आजचा महाराष्ट्र हे वेगवेगळे आहेत, हे ज्याला कळतं तोच महाराष्ट्राचं आजचं खरं चित्र रेखाटू शकेल आणि त्यावरून उद्याच्या महाराष्ट्राचं चित्र स्पष्ट करू शकेल. 'महाराष्ट्र म्हणि महंतराष्ट्र' असं चक्रधर म्हणाले. साधुसंतांचा पारमार्थिक प्रभाव आणि परकीय गुलामगिरी यातून सामाजिक विरक्तीशिवाय दुसरं काय निर्माण होणार? पण महाराष्ट्राच्या ललाटी छत्रपती शिवरायांच्या रूपाने भाग्य सूर्य उगवला आणि महाराष्ट्राच्या धमन्यांमधून शौर्य सळसळू लागलं. छत्रपती शिवराय युगपुरुष होते म्हणूनच त्यांच्या प्रेरक चरित्रातून स्वाभिमानी समाजही निर्माण झाला आणि जोतिराव फुलेंसारखेच 'महात्मा'पण फुलले. महाराणी ताराराणीही गाजल्या आणि ब्राह्मण्याच्या भुताला मुळासकट हादरवणारी कामगिरी राजर्षी शाहू यांनी केले. या सर्वांनी डॉ. आंबेडकरांचा मुक्तिमार्ग प्रशस्त केला.

मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्र धर्म वाढवावा ॥ ही कवीची इच्छा आज मूर्त रूप धारण करीत आहे. महाराष्ट्रातील सर्व जाती- जमातींचं ऐक्य हाच खरा महाराष्ट्र धर्म. अजून या महाराष्ट्र धर्माचा स्वीकार करायला काही हेकट, विघ्नसंतोषी, जात्यंध प्रवृत्ती तयार नसतील तर महाराष्ट्रधर्म त्यांना क्षमा करणार नाही. अफझलखानाला मरणोपरांत सन्मानाने दफन करणारे छत्रपती शिवराय महाराष्ट्रधर्म वाढवीत होते. पण अफझलखान वधाची चित्रं चौकात लावून जातीय दंगल घडवणारे ब्रह्मराक्षस महाराष्ट्रधर्माची माती करीत आहेत. या ब्रह्मसमंधाने समाजाला सर्वांगाने वेढलं आहे आणि त्याच्या तावडीतून सुटल्याशिवाय महाराष्ट्राच्या प्रगतीला गती येणं अशक्य आहे.

तथापि, महाराष्ट्र राज्याचा सुवर्णजयंती महोत्सव साजरा करताना आपली पावलं योग्य दिशेने पडत आहेत, याचं समाधान गाठीशी आहे, बळीराजा आता बुद्धिराजा होत आहे म्हणून तर सुवर्णजयंती अधिक तेजाळून निघतेय. शिवरायांना कलंकित करण्याचा कुजकटपणा यापुढे चालणार नाही, हे नासक्या बुद्धीच्या तथाकथित इतिहासाचार्यांना साग्रसंगीतपणे कळवून देण्यात बळीराजाचे वारस यशस्वी झाले आहेत. महाराष्ट्राची मातृदेवता, शिवजननी जिजाऊ माँसाहेब यांच्या अकलंकित कीर्तीला कलंकित करणाऱ्या नराधमांना मावळ्यांनी धडा शिकवून नवा इतिहास आता घडवला आहे. शिवचरित्रातून बनावट गुरूंची गच्छंती नव्या दमाच्या संशोधक-इतिहासकारांनी अधिकृतपणे करून बौद्धिक क्षेत्रात आपला पराक्रम नोंदवला आहे. क्षत्रिय सिसोदियाच्या वंशज शिवरायांना गवळीकुलीन म्हणून हिणवण्याच्या अधम, बनावट शोधाला चापही लावला गेला आहे. शिवपिंडीसारख्या पवित्र शोधकेंद्रातील आश्रित विंचवाच्या बिऱ्हाडाला 'पिंडीवरी विंचू आला' या अभंगातील तुकोबांच्या आदेशानुसार अधमासी अधम होऊन वहाणेने वेचण्याचं कर्तव्यही पार पाडण्यात आलं आहे. महाराष्ट्र धर्म कसा वाढवावा, कसा शुद्ध करावा, कसा जात्यंधांच्या कुप्रभातून मुक्त करावा आणि त्यासाठी मराठा तितुका कसा मेळवावा हे आता शिवबांच्या शिलेदारांना कुणी शिकवण्याची गरज नाही.

पण अजूनही मावळा भटी फासातून मुक्त झालेला नाही. म्हणून जागृत-अवतारी बनावात फसून वारीत चालतो. देवस्थानांची जमीन भूमिहीनांना देण्याच्या युगात, तिचं रक्षण करण्यासाठी कालबाह्य कायदे करतो. योग आणि भोग यात आकंठ बुडालेल्या अडाणी बाबाला डॉक्टरेट बहाल करतो. हवेतून वस्तू काढणाऱ्या जादूगाराची पायवणी पितो. 'मधुकर' वृत्तीच्या हिरेमंडित बुवाच्या दिशाहीन कीर्तनाचं आयोजन करून आपला वाढदिवस साजरा करतो. महाराष्ट्राच्या सुवर्णजयंती दिवशी या मावळ्यांचं परखड प्रबोधन होणं आवश्यक आहे. अन्यथा मराठी पाऊल पडते मागे असंच म्हणावं लागेल. ही उलटी गती सुलटी करण्यासाठी लक्षात ठेवा-

शिवबांनी दिली। प्रेरणा तुम्हाला
आता भविष्याला । भिडा तुम्ही ॥ १
त्यांच्या चरित्राचे। करा पारायण
बुद्धीने मैदान। जिंका आता ॥२
देश घडविला । वंदू त्या हातांना
बिघडविती त्यांना । ओळखून ॥ ३
तलवार आता। बुद्धीची चालवा
गुलामी झटका। भट-बुवांची ॥४
बुद्धी आणि श्रम। यांचा घाला मेळ
आळसात मूळ । गुलामीचे ॥५
बौद्धिक गुलामी। तेच परदास्य
स्वहिताचा नाश । असे तेथे ॥ ६
नव्या युगी व्हा रे। नवे शिवराय
ज्ञानाचेच भव्य । किल्ले बांधा।॥७
माझा महाराष्ट्र । धन्य शिवभूमी
पुत्र पराक्रमी । त्याचे होऊ ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# गर्जा महाराष्ट्र माझा हाच का?

महान राष्ट्र ते महाराष्ट्र अशी साधीसरळ उत्पत्ती म.म. काणे यांनी केली आहे. महान पराक्रमी तो महापराक्रमी, महानपुरुष तो महापुरुष. तद्वतच महान राष्ट्र ते महाराष्ट्र. गेली दोन वर्षे जगावरती थैमान घातलेल्या, डोळ्याला न दिसणाऱ्या एका विषाणूमुळे महाराष्ट्र दिन आपण मोठ्या उत्साहात साजरा केला नाही. पण आता कोरोना चे संकट कमी झाल्यामुळे आपण साजरा करत आहोत. १ नोव्हेंबर १९५६ रोजी 'मुंबई' या नव्या राज्याची निर्मिती झाली होती. त्यानंतरच्या काळात संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी राज्यभरात अनेक ठिकाणी निदर्शने झालीत. ८ मार्च १९६० रोजी द्वैभाषिकांचे विभाजन करणारे "मुंबई राज्य पुनर्रचना विधेयक" मंजूर झाले. १७ मार्च रोजी मुंबई विधानसभेने आपल्या भावी राज्याचे नाव "महाराष्ट्र" ठेवले. त्यानंतर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. तसेच याच दिवशी देशाच्या पर्यायाने जगाच्या विकासात कामगारांच्या योगदानाला सलाम करण्यासाठी १ मे हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. भारतातील पहिला कामगार दिन मद्रास शहरात १९२३ ला झाला. लेबर किसान पार्टी हिंदुस्थान या संघटनेने हा दिवस पाळला. देशाच्या पर्यायाने जगाच्या विकासात कामगारांच्या योगदानाला सलाम करण्यासाठी एक मे हा दिवस कामगार दिन म्हणून पाळला जातो.

छत्रपती शिवरायांसारखा प्रेरणादायी आदर्श राजा, संत आणि ग्रंथांचे संस्कार, निसर्गसौंदर्याची मुक्त उधळण, खाद्यसंस्कृतीचं वैभव, संपत्ती निमीर्ती करणारे एक महत्त्वाचे राज्य म्हणून महाराष्ट्राकडे पाहिले जाते. या राज्याचा आर्थिक इतिहास नुसता कौतुकास्पद नाही तर अनुकरणीय आहे. महाराष्ट्रात मराठी संतांनी समाजमनाची जी काही शतके मशागत केली, त्यामुळे शिवाजी महाराजांसारख्या युगकर्त्या अलौकिक राज्यकर्त्याला त्याच्या विचारांना समजून स्वीकार करणारा समाज अनायासे मिळाला. म्हणजे शिवाजी महाराजांचा अवतार होईपर्यंत संतांनी आचार-विचार, स्वातंत्र्य, समता आणि विश्वबंधुत्व आदी गुणांचे पाठ तत्कालीन समाजाकडून गिरवून घेतले होते. त्यानंतर शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व अनेक महामानवानी महाराष्ट्र घडवला. आज त्यांच्या विचारावरच महाराष्ट्र चालतोय. खरे तर या मातीत जन्मलेली संत परंपरा असो की येथील विचारवंतांनी पुरस्कृत केलेला तर्कवाद. भारतीय संगीताचे आश्रयस्थान असो की प्रगल्भ मराठी कवितेचा प्रांत असो. महाराष्ट्राने अनेक क्षेत्रात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आणि ते टिकवलेही. असा हा आपला महाराष्ट्रा पण........

आज आधुनिक महाराष्ट्रात विचारसंघर्ष होताना दिसत नाहीत. होतात ते 'चक्का-जाम', 'रास्ता रोको' किंवा 'खळ्ळ खटयाक'! ही विकारवशता झाली आहे. तसेच वैयक्तिक ताशेरे, दोषारोप, धर्माचे राजकारण, जातीपातीचे राजकारण, भावनेचे राजकारण, भ्रष्टाचार, गुन्हेगारी, स्त्रियांच्या बाबातीत गलिच्छ टिपण्या याचे प्रमाण वाढतच आहे. कोणीही राज्यकर्ते हे सत्ता टिकवण्यासाठी मतलबी व्यवहार करणार, हे उघड आहे. पण किती ? त्याला प्रमाण असावे. आपल्यामुळे राज्याचे नाव खराब होत आहे याची काळजी कोणीच करत नाही. राज्याच्या राजकारणातील जुनी पिढी ही प्रगल्भ होती. शाळा, रुग्णालये, रस्ते, पाणी असे सामान्यांशी निगडीत सामाजिक प्रश्न सोडविण्याकरीता त्यांची बांधिलकी होती. आता प्राधान्यक्रम बदलला आणि अवांतर विषयांना महत्त्व दिले जात आहे. डॉक्टर-वकील यांनी आपला समाजाचे नेतृत्व करण्याचा बाणा तर केव्हाच सोडून दिला आहे. आजचे विचारवंतही तटस्थ राहिले नाहीत, तेही मोहात गुरफटलेत. मंग समाजाला कोण तारणार? आज अवघ्या महाराष्ट्राला वैचारिकतेचे वावडे निर्माण झाले आहे आणि नीतिमत्ता, चारित्र्य, सदसद्विवेक यांचा छुपा किंवा क्वचित कोठे उघड तिरस्कार वाटू लागला आहे.

महाराष्ट्रत चाललेले गलिच्छ व किळसवाने राजकारण पहता पोटाची खळगी भरणारे, कष्ट करून खाणारे, झोपेतून उठल्यापासून ते रात्र होईपर्यंत शेतात राबणाऱ्या शेतकऱ्याला कोण काय म्हणाले, कोण जेलमध्ये गेले, कुठे ईडीची धाड पडली हे काय करायचे आहे. ब्रेकिंग न्युज आणि टी आर पी च्या या जीवघेण्या प्रसारयुगात बातम्यांची विश्वासार्हता, पुढाऱ्यांचे एकमेकांवरील आरोपांचे काही देणेघेणे नाही. ऐककाळ महाराष्ट्रातील राजकारणाचा आदर्श घेतला जात होता पण आज? शेतकऱ्यांच्या, श्रमिकांच्या अगणित आत्महत्या ही तर महाराष्ट्राच्या भूतकाळाची काळी बाजू ती आजतागायत चालू आहेच व आता त्यात आंदोलनकर्त्या असंख्य तरूणांच्या आत्महत्याची भर पडली आहे. शिक्षणतज्ज्ञ, लेखकांनी, महिलांनी व्यसने व आत्मघात यावर भाष्य केले का? आज मूल्यशिक्षण कमी झालेले दिसते. वाचन संस्कृतीचा अभाव हा तर सर्व साहित्यिक संस्था, परिषदा यांचा फार मोठा पराभव आहे. आज असे एकही क्षेत्र नाही की, जेथे भ्रष्टाचार होत नाही. उलट आज भ्रष्टाचार हाच शिष्टाचार झाला आहे. केवळ मोठ्या शहरांतूनच नव्हे, तर अगदी खेडोपाडीसुद्धा कामांच्या कागदांवर 'वजन' ठेवले नाही तर कामे होत नाहीत. पवलोपावली भ्रष्टाचार होताना दिसतो पण त्या विषयी कोणीही बोलत किंवा तक्रार करत नाही. अगदी बोटावर मोजण्याइतके प्रमाण तक्रारीचे आहेत. हे सर्व महाराष्ट्र आहे असे नाही. संपूर्ण देशात हेच आहे.

फक्त जय महाराष्ट्र म्हणून बदल होणार नाही तर कोणत्या गोष्टी महाराष्ट्राच्या विकासाच्या आड येतात त्या गोष्टीचा विचार करायला हवा. भ्रष्टाचार, गरिबी, मुलींवरचे अत्याचार या गोष्टींचा नायनाट केला पाहिजे. पूर्वजांनी दिलेल्या योगदानाची जाणीव ठेवली पाहिजे आणि प्रगतीची नवी शिखरे करण्याचा निर्धार केला पाहिजे. शेवटी मी एवढेच म्हणेन.........महाराष्ट्राची यशो गाथा, महाराष्ट्राची शौर्य कथा, पवित्र माती लावू कपाळी, धरणी मातेच्या चरणी माथा. सर्व महाराष्ट्रातील जनतेला महाराष्ट्र दिनाच्या व कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा........

**प्रा. तात्यासाहेब शिवाजी काटकर,**
अकलूज ९२२६१४४८३६
सदाशिवराव माने विद्यालय, अकलूज
(महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक असून ते शैक्षणिक व सामाजिक विषयावर लेखन करतात)

पान १ वरून

## सर्व विभाग व तालुका प्रमुख...

करण्यासाठी याचा वापर करण्यास सुरुवात झालेली आहे, असे त्यांनी सांगितले.

जिल्ह्यात पुरवठा विभाग, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, पशुसंवर्धन विभाग, महिला व बाल विकास विभाग या विभागांचे लाभार्थी अधिक असल्याने अक कॉलिंग सेंटर साठी त्यांचा प्राधान्याने विचार केलेला असून त्यानंतर सर्व शासकीय विभागात हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. ए आय कॉलिंग सेंटर द्वारे कॉल केल्यानंतर संबंधित व्यक्तीचे किंवा लाभार्थ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येणार आहे त्यांनी केलेल्या माहितीचा डेटा संकलित करून संबंधित तालुका प्रमुख अथवा विभाग प्रमुख पहिल्या आठवड्यात आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही करतील तर प्रत्येक महिन्याला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हाधिकारी स्वतः तक्रारीच्या अनुषंगाने आढावा घेऊन त्या तक्रारींचे निवारण करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली.

ज्या ठिकाणच्या तक्रारी कमी असतील त्या ठिकाणी एआय कॉलिंग सेंटर द्वारे कॉल चे प्रमाण कमी करण्यात येऊन ज्या ठिकाणी जास्त तक्रारी येत आहेत त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर कॉल करून डेटा संकलन करण्यात येणार आहे. त्यामुळे सर्व संबंधित विभाग प्रमुख तसेच तालुका कार्यालय प्रमुख यांनी उडान 2025 अंतर्गतचे अक कॉलिंग सेंटर चे प्रशिक्षण व्यवस्थित घ्यावे. येणाऱ्या अडचणी याच ठिकाणी विचारून त्याचे निराकरण करून घ्यावे जेणेकरून प्रत्यक्ष वापर करताना नागरिकांचे प्रश्न तात्काळ सोडवण्यात त्याचा लाभ होईल. हा उपक्रम नाविन्यपूर्ण असून पुढील एक दोन महिन्यात व्यवस्थितपणे हा उपक्रम प्रत्येकाला समजेल व त्याचे चांगले परिणाम ही दिसून येतील असे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.

महिला बाल विकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले यांनी आपल्या प्रास्ताविकात या कार्यक्रमाचा उद्देश सांगितला. तसेच प्रशासकीय कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करणारा सोलापूर हा देशातील पहिला जिल्हा असेल असेही त्यांनी सांगितले.

प्रारंभी महात्मा बसवेश्वर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले तसेच दीप प्रज्वलन करून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते उडान 2025 या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सर्व उपस्थित यांचे आभार मानले.

लाभार्थीः- जिल्ह्यात 3250 शासनमान्य स्वस्त धान्य दुकाने आहेत. या अंतर्गत 16 लाख 50 हजार लोक प्रत्येक महिन्याला दोन किलो तांदूळ व तीन किलो गहू घेतात. या सर्व यंत्रणेवर नियंत्रण असणे आवश्यक आहे त्यामुळे ए आय कॉलिंग सेंटरच्या माध्यमातून यावर नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे. तसेच शिक्षण विभाग अंतर्गत अडीच ते तीन हजार शाळा व दहा ते बारा हजार शिक्षक तसेच लाखो विद्यार्थी आहेत त्याचप्रमाणे आरोग्य विभागाकडे लाभार्थींची संख्या मोठ्या प्रमाणात आहे यामुळे या विभागाच्या योजना कार्यपद्धती व नागरिकांना या योजनांचा लाभ मिळतो की नाही या अनुषंगाने या उपक्रमा अंतर्गत नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः अ‍ॅड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# जातनिहाय जनगणनेचा केंद्राचा निर्णय स्वागतार्ह : उपमुख्यमंत्री अजित पवार



**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** 'जातनिहाय जनगणना करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय स्वागतार्ह असून यामूळे सर्व समाजघटकांना त्यांचा न्याय्य हक्क मिळण्यास मदत होईल. सामाजिकदृष्ट्या दुर्बल, वंचित, उपेक्षित समाजबांधवांच्या विकासासाठी सरकारला अधिक निधी देता येईल. मागास समाजघटकांचा शैक्षणिक, आर्थिकस्तर उंचावण्यास मदत होऊन सामाजिक समता प्रस्थापित करण्याचे ध्येय वेगाने साध्य करता येईल. जातनिहाय जनगणनेचा निर्णय म्हणजे सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या दिशेने केंद्र सरकारने टाकलेले महत्वपूर्ण, क्रांतिकारी पाऊल आहे.' अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्र सरकारच्या निर्णयाचे स्वागत केले असून हा क्रांतिकारी निर्णय घेतल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि संपूर्ण केंद्रीय मंत्रिमंडळाचे आभार मानले आहेत.

जातनिहाय जनगणनेच्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निर्णयावर प्रतिक्रिया देताना उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, जातनिहाय जनगणना करण्याची मागणी अनेक व्यक्ती, संस्था, संघटना गेल्या अनेक दशकांपासून करत आहेत. ही मागणी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्यासारख्या दूरदृष्टीच्या, संवेदनशील नेतृत्वामुळेच पूर्ण होऊ शकली. जातनिहाय जनगणना होत नसल्याने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती वगळता अन्य जातींच्या लोकसंख्येच्या आर्थिक, सामाजिक स्थितीची माहिती उपलब्ध होत नव्हती. याचा फटका ओबीसी समाजबांधवांसह इतरही समाजघटकांना फटका बसत होता. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने जातनिहाय जनगणनेच्या निर्णयामुळे केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना योग्य समाजघटकांपर्यंत पोहचण्यास मदत होईल. यातून सर्व समाजांना विकासाची समान संधी उपलब्ध होईल हा निर्णय येणाऱ्या भविष्यकाळात जातव्यवस्था संपूष्टात आणण्यास मदत करणारा ठरेल, असा विश्वासही उपमुख्यमंत्री पवार यांनी व्यक्त केला आहे.

# 'पुढच्या वर्षी परत जम्मू काश्मीरला जाणार'

## सोलापूरच्या पर्यटकाने सांगितला पहलगाम हल्ल्याचा अनुभव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर देशभरात संतापाची लाट उसळली आहे. सोलापूरमधील काही पर्यटक सुखरूपरित्या घरी परतले आहेत. पंडित बनसोडे असे पर्यटकाचे नाव असून त्यांच्यासोबत जवळपास 40 पर्यटक सोबत होते. सर्व पर्यटकांना सुखरूपरित्या परत आणण्याचे काम पंडित बनसोडे यांनी केले. पंडित बनसोडे यांनी प्रत्यक्ष आलेला अनुभव व्यक्त करताना त्यांनी महत्वाच्या विषयावर भाष्य केले. दहशतवाद्यांनी धर्म विचारून गोळ्या घातल्या.



हा काहीतरी राजकीय षडयंत्र असू शकतो, जम्मू काश्मिर राज्यात असं जातीपातीच राजकारण नाहीय. भारतीय नागरिकांनी अशा जातीपातीच्या राजकारणात बळी पडू नये अशी, विनंती पंडित बनसोडे यांनी केली आहे. दहशतवाद्यांना जात नसते, त्यामुळे जातीच राजकारण करू नये. उलट माज्यासह चाळीस पर्यटकांना काश्मीरमधील मुस्लिम नागरिकांनी मोलाची मदत केली.

दरवर्षी आम्ही काश्मीरला फिरायला जातो, या आतंकवादी हल्ल्यामुळे घाबरणार नाही, पुढच्या वर्षी पुन्हा काश्मीरला जाणार,पहलगामला जाणार असा आत्मविश्वास पंडित बनसोडे यांनी व्यक्त केला. पहलगामवर झालेल्या हल्ल्यानंतर सर्वत्र भितीचे वातावरण बघायला मिळाले. दहशतवाद्यांनी हिंदू टार्गेट केले. हेच नाही तर या हल्ल्याचे अनके व्हिडीओ आणि फोटो हे सोशल मीडियावर तूफान व्हायरल होताना दिसत आहेत.

### पहलगाम हल्लानंतर भारताची आक्रमक भूमिका

पहलगामवरील हल्ल्यानंतर लोकांमध्ये एक संताप बघायला मिळतोय. भारताने हल्ल्यानंतर पाकिस्तान विरोधात आक्रमक भूमिका घेतलीये. सिंधू नदीचे पाणी रोखण्यात आले. लोकांमध्ये एक वेगळाच संताप या हल्ल्यानंतर दिसतोय. हे दहशतवादी पाकिस्तानमधून आल्याचे स्पष्ट झालंय. हल्ला केल्यानंतर दहशतवाद्यांनी घटनास्थळावरून पळ काढला. सुरक्षा यंत्रणा या दहशतवाद्यांच्या मागावर आहेत. लष्कराकडून जम्मू काश्मीरमध्ये सर्च ऑपरेशन राबवले जातंय. काल देखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उच्चस्तरीय अधिकाऱ्यांसोबत एक महत्वाची बैठक दिल्लीमध्ये घेतली. या हल्ल्यानंतर पाकिस्तानचे काही मंत्री भडकावू भाष करताना दिसत आहेत.

# बार्शी तालुक्यात गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेतून ७ कोटी ४० लाख अनुदान

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** बार्शी तालुक्यातील ३४ जलसाठ्यातील ३४ लाख १६ हजार घनमीटर काढलेल्या गाळाचे २ हजार ७०१ गाळ वाहून नेणाऱ्या शेतकऱ्यांना ७ कोटी ४० लाख रुपयांचे अनुदान मंजूर झाले असून, ग्रामपंचायतीमार्फत या अनुदानाचे वाटप होणार आहे.

आमदार दिलीप सोपल यांनी या अनुदानाची माहिती दिली. आमदार सोपल म्हणाले, की धरण, जलसाठ्यामधून गाळ काढण्यात आलेल्या व पूर्ण झालेल्या कामांकरिता जलयुक्त शिवार अभियान २.० योजनेच्या लेखाशिषार्तून तलावातील काढलेल्या गाळाचे अशासकीय



संस्थांचे व शेतकऱ्यांचे अनुदानाचे देयक अदा करण्यासाठी नुकतेच आदेश देण्यात आलेले आहेत.

बार्शी तालुक्यामधील ल. पा. तलाव कळंबवाडी (भाग-२), ल. पा. तलाव वैराग (भाग-२), मध्यम प्रकल्प हिंगणी (पा.) (भाग- २) (ब),मध्यम प्रकल्प हिंगणी (पा.) (भाग- ४), ल.पा. तलाव तावडी (भाग-२),ल. पा. तलाव ममदापूर (भाग-२),ल. पा. तलाव पाथरी,ल. पा. तलाव पाथरी (भाग-२),ल. पा. तलाव पाथरी (भाग-३),ल.पा. तलाव, बाभूळगाव, ल. पा. तलाव बाभूळगाव (भाग-२), ल.पा. तलाव बाभूळगाव (भाग-३),ल. पा. तलाव पाथरी (भाग-४),ल. पा. तलाव शेळगाव (आर) (भाग-३), मध्यम प्रकल्प हिंगणी (पा.) (भाग-७), ल. पा. तावडी,ल. पा. तावडी (भाग-३),ल. पा. झाडी बोरगाव ,ल. पा. तलाव झाडी बोरगाव (भाग-२),ल.पा. तलाव कोरेगाव,ल. पा. तलाव काटेगाव (भाग-२),ल.पा. तलाव वैराग,ल. पा. तलाव गोरमाळे (भाग-२ ) , मध्यम प्रकल्प हिंगणी (पा.) (भाग- ३),मध्यम प्रकल्प हिंगणी (पा.) (भाग- २) (अ),मध्यम प्रकल्प हिंगणी (पा.), (भाग-५), मध्यम प्रकल्प हिंगणी (पा.) (भाग-६), ल. पा. तलाव कोरेगाव (भाग-२),ल.पा. तलाव शेळगाव आर,ल. पा. तलाव शेळगाव (आर) (भाग-२), मध्यम प्रकल्प पिंपळगाव ढाळे (भाग-२), मध्यम प्रकल्प पिंपळगाव ढाळे (भाग-३), मध्यम प्रकल्प पिंपळगाव ढाळे (भाग-४),ल.पा. तलाव ममदापूर या तलावाच्या जलसाठ्यामधून काढलेल्या गाळामधून शेतकऱ्यांनी सदरचा गाळ वाहून नेऊन त्यांचे शेतात पसरला आहे, लवकरच पात्र शेतकरी आणि संस्थांच्या बँक खात्यामध्ये आरटीजीएसद्वारे रक्कम वितरित करण्यात येणार आहे, असेही आमदार सोपल यांनी सांगितले.

# सोलापुरात आसरा रेल्वे उड्डाणपुलाचे पुन्हा दुसऱ्यांदा भूमिपूजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरात महारेलमार्फत आसरा चौकातील रेल्वे दुपदरी उड्डाणपुलाच्या कामाचा दोन वर्षांपूर्वी मुहूर्त लागला होता. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी ३ जून २०२३ रोजी त्याचे भूमिपूजनही केले होते.

परंतु नंतर गेल्या दोन वर्षात या कामाची एकसुध्दा वीट हलली नाही. त्यानंतर पुन्हा दुसऱ्यांदा या उड्डाणपणाच्या कामाचे भूमिपूजन बुधवारी भाजपचे स्थानिक आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

होटगी रोड आणि जुळे सोलापूर भागाला जोडणारा आसरा चौक रेल्वे उड्डाणपूल नेहमीच वर्दळीचा ठरतो. वाढत्या वर्दळीमुळे या उड्डाणपुलाचे दुपदरीकरण होण्यासाठी आमदार सुभाष देशमुख यांनी केंद्रीय रस्ते



वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा केला होता. त्यानुसार दोन वर्षांपूर्वी या कामासाठी ३२ रुपयांचा निधी मंजूर झाला होता. त्यानुसार गडकरी यांच्याच हस्ते या उड्डाणपुलाच्या कामाचे भूमिपूजनही झाले होते. त्याप्रमाणे ३२० मीटर लांबीच्या या उड्डाणपुलाच्या कामाचे कंत्राट सीएस कन्स्ट्रक्शन इंडिया प्रा. लि. कंपनीला मिळाले होते. हे काम ४५० दिवसांत पूर्ण करावयाचे होते. परंतु हा संपूर्ण कालावधी उलटून गेला तरी प्रत्यक्षात उड्डाणपुलाचे काम अद्यापि सुरू झाले नाही.

या उड्डाणपुलाचे दुपदरीकरण करताना प्रामुख्याने सोलापूर महापालिकेच्या जलवाहिनीचा अडथळा येणार होता. ही जलवाहिनी स्थलांतरित करण्यासाठी सुमारे १२ कोटी रुपयांचा खर्च येणार होता. मात्र महापालिका प्रशासनाने त्याची जबाबदारी घेण्यास नकार दिला होता. त्यानंतर रेल्वे प्रशासनानेही हात वर केले होते. या पार्श्वभूमीवर आमदार सुभाष देशमुख यांनी राज्य सरकारकडून १२ कोटी रुपये निधी उपलब्ध होण्यासाठी पाठपुरावा सुरू केला असता तेथेही विलंब झाला. त्यामुळे आसरा चौक उड्डाणपुलाचे काम दोन वर्षांपासून पूर्ण रखडले होते.

दरम्यान, आमदार सुभाष देशमुख यांनी जलवाहिनी हस्तांतरित न करता उड्डाणपूल कसे उभारता येईल, यासाठी रेल्वे, महापालिका, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण प्रशासन आणि महारेल यांच्या बैठका घेतल्या. शेवटी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याच सूचनेनुसार जलवाहिनी न हलवता उड्डाणपूल उभारण्याचे ठरले. त्याप्रमाणे अखेर या उड्डाणपुलाच्या या उड्डाणपुलाच्या दुपदरीकरणाच्या कामाला पुन्हा दुसऱ्यांदा मुहूर्त लागला. त्याचे भूमिपूजन अर्थात आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. हे काम मुदतीत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

## Classified - छोटी जाहीरात

### मंगल कार्यालय

लग्न, रिसेप्शन, साखरपुडा, मुंज, बारसे, वाढदिवस नव्या स्वरूपात सर्व सोयी सुविधांसह उपलब्ध.

**सौभाग्य मंगल कार्यालय**

आरटीओ जवळ, विजापूर रोड, सोलापूर, **मो.: ९०९६९६६२२२**

### विकणे आहे

- सोलापूर - अक्कलकोट रोड टच कोन्हाळी येथे 5 एकर जमीन विकणे आहे
- सोलापूर - पुणे हायवे रोड टच वडाची वाडी येथे साडे सहा एकर जमीन विकणे आहे
- सोलापूर - तुळजापूर रोड टच उळे येथे 33 गुंठे जमीन विकणे आहे
- गुळवंची - कोंडी रोड टच प्रति गुंठा 1 लाख प्रमाणे 11-11 गुंठे जमीन विकणे आहे.
- सोलापूर सिटीत संभाजी चौक ते रेल्वे ट्रॅक रोड टच प्लॉट विकणे आहे

मो. 9860848471/ 7741077411

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-

8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

**9822964815**
**9421984815**

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...



दारू... अंमली पदार्थ... गॅरंटेड सुटण्यासाठी...



व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..

(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)

**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**

फोन: 9552619752

कॉल/व्हॉटस्अॅप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...

501% रिझल्ट

**वाचकांसाठी निवेदन**: या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# गोपाळपूर येथील वाळू तस्करीवर पुन्हा हातोडा; दोन जणांवर गुन्हा दाखल

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर तालुक्यातील गोपाळपूर येथे वाळू तस्करीने थैमान घातले होते. या तस्करीवर अंकुश ठेवण्याचे काम, पंढरपूर तालुका पोलीस ठाण्याने हाती घेतल्याचे दिसत असून, सलग चार दिवसात वाळू तस्करीवर दुसरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी महेश ज्ञानेश्वर गडदे आणि विजय इंगळे या दोन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, सोमवार दि. २८ एप्रिल रोजी पहाटे ५:३० वाजण्याच्या सुमारास गोपाळपूर हद्दीतील भीमा नदीच्या पात्रातून वाळूचे अवैध उत्खनन



करून महेश गडदे आणि विजय इंगळे हे बिगर नंबरचे अशोक लेलँड कंपनीचे छोटे टेम्पो मधून वाळू चोरून घेऊन जात होते. हे पोलिसांच्या निदर्शनास आले.

दोन्ही टेम्पोमध्ये दोन दोन ब्रास वाळू भरलेली होती. या दोन्ही वाहनांसह वाळू ताब्यात घेऊन, संबंधित दोन जणांवर पोलीस हेडकॉन्स्टेबल मंगेश रेकडे यांनी पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पंढरपूर तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी.वाय. मुजावर यांनी वाळू तस्करीवर आपली नजर वळवल्याचे दिसत आहे.

### वाळू तस्करांवर गुन्हे दाखल होण्याचे काम सुरू

काही दिवसांपूर्वी महसूल प्रशासन आणि पोलीस प्रशासनाकडून वाळू तस्करी विरोधात कारवाया केल्या जात होत्या. परंतु या कारवाईत बिगर नंबरचे वाहन अथवा वाळूचे ढिगारे दाखवून अज्ञात वाळूतस्करांवर गुन्हे दाखल करण्यात येत होते. पंढरपूर तालुका पोलीस प्रशासनाकडून प्रथमच वाळू तस्करांवर गुन्हे दाखल करण्याचे काम सुरू झाले आहे. तालुका पोलीस प्रशासनाच्या या कारवायांचे सामान्य नागरिकांकडून जोरदार स्वागत होत आहे.

## सोलापूर महानगरपालिका,सोलापूर

इंद्रभुवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर-४१३००१

**सार्वजनिक आरोग्य अभियंता (जलवितरण विभाग)** smcphewtr@gmail.com

जा.क्र.साआअ/जल/१२४ — दि.२९/०४/२०२५

### दुसरी मुदतवाढ

सोलापूर म.न.पा.चे विभागी कार्यालय क्र.१ते८ कडील प्रभागातील दुषित पाणी पुरवठा सुधारणे कामी नव्याने पाईप लाईन टाकणेकरीता लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना सन २०२५-२६ अंतर्गत कामाचे ई-निविदेस खालीलप्रमाणे दुसरी मुदतवाढ देण्यात आली आहे.

1)Tender ID-2025-SMC-1171801_1, 2)Tender ID-2025-SMC-1171770_1, 3)Tender ID-2025-SMC-1171591_1, 4)Tender ID-2025-SMC-1171434_1, 5)Tender ID-2025-SMC-1171604_1, 6)Tender ID-2025-SMC-1171680_1, 7)Tender ID-2025-SMC-1171725_1, 8)Tender ID-2025-SMC-1171637_1, 9)Tender ID-2025-SMC-1171653_1, 10)Tender ID-2025-SMC-1171430_1

या कामाचे टेंडर शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि.३०/०४/२०२५ पासुन पाहण्यास उपलब्ध आहे.

सही/-
**प्र.सार्वजनिक आरोग्य अभियंता**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**


# सोलापुरात नवप्रशिक्षित डॉक्टरची आत्महत्या

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापुरात डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएसचे वैद्यकीय पदवी शिक्षण पूर्ण करून पुढील वर्षांकरिता इंटर्नशिप करीत असलेल्या एका नवप्रशिक्षित तरुण डॉक्टरने राहत्या घरी स्वतःचा गळा कापून आत्महत्या केली. जुळे सोलापुरातील कल्याण नगराजवळ एका घरात दुपारी हा प्रकार घडला. आदित्य नांबियार (वय २३, रा. नेरूळ, नवी मुंबई, मूळ राहणार केरळ) असे आत्महत्या केलेल्या दुदैवी नवप्रशिक्षित डॉक्टरचे नाव आहे. शहरात दहा दिवसांपूर्वी ज्येष्ठ मेंदूविकारतज्ज्ञ डॉ. शिरीष वळसंगकर (वय ७०) यांनी राहत्या घरी स्वतःच्या डोक्यात गोळ्या झाडून आत्महत्या केली होती. या घटनेमुळे वैद्यकीय क्षेत्राला धक्का बसला असताना त्यानंतर आज मंगळवारी ही दुसरी घटना घडली.

आदित्य नांबियार यांचे वडील भारतीय नौसेना दलात व्यावसायिक सागरी सेवेत अधिकारीपदावर सेवेतील निवृत्त अधिकारी आहेत. त्यास एक विवाहित बहीण असून ती बंगळुरूमध्ये अभियांत्रिकी क्षेत्रात सेवेत आहेत. तर आई गृहिणी आहे. नांबियार कुटुंबीय नवी मुंबईत नेरूळ येथे राहतात. आदित्य याने सोलापूरच्या डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएस वैद्यकीय पदवी शिक्षण नुकतेच पूर्ण केले होते. त्यानंतर पुढील वर्षांकरिता व्यावसायिक अनुभव घेण्यासाठी तो याच वैद्यकीय महाविद्यालयात आंतरवासिता (इंटर्नशिप) म्हणून सेवेत होता. त्याने दुपारी जुळे सोलापुरातील खासगी निवासस्थानी स्वच्छतागृहात स्वतःचा गळा चाकूने कापून घेतला. तो रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या अवस्थेत आढळून आला. त्यामुळे वैद्यकीय महाविद्यालयातील त्याच्या सहकारी विद्यार्थी मित्रांसह डॉक्टर, प्राध्यापक मंडळींना धक्का बसला.

महाविद्यालयाचे उपअधिष्ठाता डॉ. नरेश झांजड यांनी दिलेल्या माहितीनुसार आदित्य नांबियार हा अभ्यासात हुशार होता. त्याने वैद्यकीय पदवी शिक्षण गुणवत्तेने पूर्ण केले होते. त्याने महाविद्यालयीन जीवनातील अडचणी किंवा आपल्या खासगी बाबींसह कोणत्याही प्रकारची एकदाही तक्रार केली नव्हती. त्याची मानसिकता उत्तम होती. परंतु त्याने अचानकपणे आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय का घेतला, हे समजू शकले नाही. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच विजापूर नाका पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्याचे आई-वडीलही दाखल झाले. आदित्य याच्या मृतदेहाजवळ चाकू सापडला. त्याने केलेल्या आत्महत्येचे कारण लगेचच समजू शकले नाही.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) शाहरूखचा हिंदी चित्रपट, श्रीमंत (हिंदीत) २) भारतीय क्रिकेट टीमचे प्रशिक्षक-राहुल *** ३) दूध संकलनाचे ठिकाण ४) राजस्थान मधील एक जात ५) महाराष्ट्रातील भाजपचे एक नेते ६) कमा उलट लिहा ७) असह्य वेदना, त्रास ११) पक्षाचा जाहीरनामा १२) होडी, नौका १४) खरे (हिंदीत) १५) राशीचक्रातील एक रास १६) अमेरिकेचे एक माजी राष्ट्राध्यक्ष १७) एखाद्याच्या बाजूने दिलेली ग्वाही २०) हेळसांड, दुर्लक्ष २३) भारतीय माजी विकेटकिपर- साबा ***२५) ध्येयपूर्तीकरता या गोष्टी पणाला लावतात-** ** ** २६) आमदारांचे सभागृह २८) श्रीकृष्णाची कपटी मावशी ३१) इंग्रजी मुळाक्षरातील एक अक्षर ३४) कमी जास्त नसणे, बरोबर ३७) हिंदी चित्रपट निर्माता- ** चोप्रा ३८) किमानच्या विरूध्दार्थी, आश्चर्य ३९) होकारच्या विरूध्दार्थी ४०) भिंतीवरून सरपटणारा सरड्याप्रमाणे जीव ४२)लक्ष वेधण्यासाठी केलेला विचित्र हावभाव ४४) श्रीलक्ष्मी, विष्णूपत्नी ४५) निवडणुकीत उमेदवाराला देतात ते व्होट ४६) एक म्हण-** वसे ते स्वप्नी दिसे

**आडवे शब्द :** १) भारतीय क्रिकेट टीममधील एक अष्टपैलू खेळाडू ५) विमान उतरण्याची जागा ८) शर्थ, निर्बंध ९) सेवक, चाकर १०) मोकळा वेळ १२) आवड, छंद १३) शपथ (हिंदीत) १७) एक संत-*** माळी १८) याचना करणारा, मागणारा १९) नगरपालिका प्रमुख २१) लग्नानंतर नवरा-नवरीची काढलेली मिरवणूक २२) नेता, प्रमुख, अनिल कपूरचा एक चित्रपट २३) गोलाकार रांग, बाजूला २४) मुलाची मुलगी २६) इंन्श्युरन्स (मराठीत) २७) हिंदी सिनेसृष्टीतील एक अभिनेता २९) फळातील बीज ३०) जुनाच्या विरूध्दार्थी ३२) फळांचा राजा ३३) इच्छा (हिंदीत) ३४) वेळ (हिंदीत) ३५) स्त्रियांचा नाकात घालण्याचा दागिना ३६) पत्राच्या सुरूवातीचा मजकूर ३८) स्वागतासाठी उभारतात ती, अर्धवर्तुळाकार ४१) कामाचा दिला जाणारा आर्थिक मोबदला ४३) गुणाकारच्या विरूध्दार्थी ४५) तलम सुती कापड ४७) बोटाच्या पुढील टणक आवरण ४८) सचिन तेंडुलकरचे गुरू -**** आचरेकर

## सुडोकु - 239

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 4 | | | 3 | 1 | 5 | 6 | |
| | | | | | | | 4 | 2 |
| 8 | | | 2 | | 5 | | | |
| 3 | 1 | 2 | 4 | | | | 8 | |
| 9 | | 8 | | 2 | | 7 | | |
| | | 4 | | | 3 | 2 | | 9 |
| 7 | | 1 | | 5 | 4 | 9 | 2 | |
| | 3 | | 7 | | 2 | 8 | 5 | |
| 5 | | | | 1 | 9 | | | 3 |

# रखरखत्या उन्हात युवक कॉंग्रेसच्या पानपोईच्या पाण्यामुळे प्रवाशांना आत्मिक समाधान- खा. प्रणीती शिंदे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहर उत्तर विधानसभा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष महेश (पैलवान) लोंढे च्या वतीने स्वर्गीय संभाजीराव शिंदे यांच्या स्मरणार्थ सोलापूर मध्यवर्ती बसस्थानक आवारात खासदार प्रणितीताई शिंदे यांच्या हस्ते पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले. एसटी स्टँड आवारात ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांना वाढत्या उन्हामुळे कोणत्याही प्रकारची पाण्याची अडचण भासू नये परगावाहून प्रवासी व नागरिक येतात त्यांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी हा उद्देश ठेवून हा उपक्रम हाती घेण्यात आल्याचे महेश लोंढे यांनी सांगितले. यावेळी खासदार प्रणितीताई शिंदे यांनी बोलताना म्हणाले की हा अतिशय चांगला उपक्रम राबविला यामुळे नागरिकांची तहान भागविण्याच्या दृष्टिकोनातून हा अतिशय चांगला उपक्रम राबवून रखरखत्या उन्हात युवक कॉंग्रेसच्या पाणपोईच्या



पाण्यामुळे प्रवाशांना आत्मिक समाधान मिळेल असे गौवोद्गार काढले.

याबद्दल महेश लोंढे यांचे विशेष कौतुक केले उन्हाळ्याच्या दृष्टीकोनातून असे उपक्रम शहराच्या प्रत्येक भागात युवक कॉंग्रेसने राबविण्यात यावे असे आवाहन केले.

यावेळी राज्य परिवहन महामंडळाचे सोलापूर विभागीय नियंत्रक अमोल गोंझारी, वरिष्ठ आगर व्यवस्थापक उत्तमराव जोंधळे साहेब, कनिष्ठ आगार व्यवस्थापक नागनाथ जाधव, कॉंग्रेसचे प्रवक्ते प्राध्यापक अशोक निम्बर्गी सर, नगरसेवक सी ए.विनोद भोसले, शहर युवक अध्यक्ष गणेश डोंगरे, महिला अध्यक्ष प्रमिलाताई तूपलवंडे, भिमशक्ती संघटनेचे शहर कार्याध्यक्ष मनोज लोंढे, परिवहन समिती सदस्य तिरुपती परकीपंडला, एडवोकेट करीमुनिसा बागवान, मातंग समाजाचे ज्येष्ठ नेते भैरू लोंढे, शोभाताई बोबे, विवेक कन्ना, शाहू सलगर, सुनील होटकर, राजेंद्र शीरकुल, सुभाष वाघमारे, संजय गायकवाड, नूरअहमद नालवार, श्रीकांत दासरी, राजाभाऊ निकम, यश शिंदे, निखील पवार, गणेश वाघमारे, सुरज शिंदे, एस.टी स्टॅन्ड रिक्षा स्टॉपचे अध्यक्ष अतिश शिंदे, विष्णू जाधव, सुदर्शन कांबळे, मल्लू सलगरे, अभिजीत डोलारे, अभिजीत पटोळे, गणेश चंदनशिवे, आदित्य म्हमाणे, महेंद्र शिंदे, अजय रणदिवे, पृथ्वीराज लोंढे, आकाश जांभळे, प्रफुल्ल फडतरे, आकाश इंगळे, पृथ्वीराज जाधव, दिगंबर गायकवाड, ओंकार शिंदे, साहिल जाधव, विनायक सज्जन, बंटी खंदारे, महेश कांबळे, अभिषेक अचूकुटला, महादेव लोखंडे, अभिषेक सोनवणे, साहेबराव पवार, समाधान मोरे, विजय रणदिवे, नागेश भुतवाळे, ओम कदम, मोठ्या प्रमाणात युवक उपस्थित होते.

# शिष्यवृत्ती परीक्षेत गुलमोहोर इंग्लिश स्कुलचे यश



**माळीनगर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद यांच्या मार्फत आयोजित केलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत येथील गुलमोहोर इंग्लिश मिडीयम स्कुल माळीनगरचे इ.५ वी तील ६ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

यामध्ये इ.५ वी तील विद्यार्थी १) स्वरा कुणाल एकतपुरे १८४ गुण, २) स्वराक्षी कौस्तुभ पोतदार १८० गुण, ३) आराध्या संदीप गिरमे १४६ गुण, ३) विश्वेषा विशाल सरतापे १४६ गुण, ४) तेजश्री गणेश उंबरदंड १३८ गुण, ५) राजकन्या हनुमंत महाडिक पाटील १२६ गुण, ६) गुरुराज आबासाहेब पालवे १२४ गुण मिळवून शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले आहेत.

शिष्यवृत्ती परीक्षेतील सर्व पात्र विद्यार्थी, विद्यार्थिनींचा संस्थेतर्फे व स्कुलतर्फे दि सासवड माळी एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी अजय गिरमे यांचे हस्ते भेटवस्तू व गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास स्कुलचे प्रिन्सिपल वसंत आंबोडकर, तसेच पालक, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. या विद्यार्थ्यांना सहशिक्षिका सपना भेंडीगेरी, सीमा जाधवर, प्रफुल्ल मुसळे यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन राजेंद्र गिरमे, व्हा.चेअरमन नितीन इनामके, सेक्रेटरी अजय गिरमे, खजिनदार ज्योतीताई लांडगे, संचालक अशोक गिरमे, अनिल रासकर, ॲड.सचिन बधे, डॉ. अविनाश जाधव, रत्नदीप बोरावके, कल्पेश पांढरे, पृथ्वीराज भोंगळे, दिलीप इनामके, संचालिका लीनाताई गिरमे व विश्वस्त मंडळ यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# नेताजी प्रशालेस मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा पुरस्कार प्रदान



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेस पंचायत समिती उत्तर सोलापूर गटशिक्षणाधिकारी कार्यालयाच्यावतीने 'मुख्यमंत्री माझी शाळा व सुंदर शाळा' या अभियानांतर्गत आयोजित उपक्रमातून तृतीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला.

सिंहगड इंजिनिअरिंग कॉलेज येथे झालेल्या कार्यक्रमात शिक्षणाधिकारी कादर शेख, उपशिक्षणाधिकारी स्वाती हवेले, गटशिक्षणाधिकारी सिद्धेश्वर निंबर्गी, गटविकास अधिकारी बाबासाहेब पाटील, विस्तार अधिकारी बापूराव जमादार, शिक्षक संघटनेचे नेते ज.रा. मोरे, वडाळ्याचे सरपंच राजेंद्र साठे आदी मान्यवरांच्या हस्ते मुख्याध्यापक रविशंकर कुंभार व पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे यांना सन्मान चिन्ह, शाल श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रशालेचे सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात दुसऱ्या टप्प्यातील मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानाअंतर्गत आयोजित विविध उपक्रमांच्या स्पर्धेत प्रशालेने सहभाग घेतला. शासनाने आखून दिलेल्या शैक्षणिक गुणवत्ता, आरोग्याची स्वच्छता, पर्यावरण, क्रीडा, शालेय प्रशासन, भौतिक सुविधा, सांस्कृतिक सहभाग आदी निकष प्रभावीपणे राबविल्याने हा पुरस्कार मिळाला.

पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थाध्यक्ष अण्णाराव कुंभार, खजिनदार ललिता कुंभार, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर म्हेत्रे आदींनी सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त एकदिवसीय कार्यशाळा- शितलदेवी मोहिते पाटील

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची त्रिशताब्दी जयंती निमित्त, PM USHA योजनेअंतर्गत एकदिवसीय नवउद्योजक मार्गदर्शन व कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती. शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा सौ शितलदेवी धैर्यशील मोहिते पाटील यांनी दिली

हा उपक्रम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, ग्रीनफिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर अॅन्ड टेक्नॉलॉजी, विजयसिंह मोहिते-पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग, रोटरी क्लब सराटी डिलाईट, राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळ (NSIC) आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग



मंत्रालय (MSME) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येत आहे.

शिवरत्न शिक्षण संस्था व शिवपार्वती विकास व सेवा ट्रस्ट यांचे वतीने मा आ रणजितसिंह मोहिते पाटील व मा खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शना खाली आयोजित होते असलेल्या या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यासाठी थायलंड सरकारच्या अर्थमंत्रालयाचे वाणिज्य सल्लागार चेतन नरके, 'टू ब्रदर्स कंपनी'चे सत्यजित हांगे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विदयापिठाचे प्र कलगुरू डॉ दामा, कौशल्य विकास व पी एम उषा योजनेचे संचालक डॉ प्रभाकर कोळेकर, एम एस एम ई चे श्री खुजनारे, श्री मिलींद बारापत्रे, श्री रितेश रंगारी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रम दिनांक 2 मे २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत, शंकरनगर-अकलूज येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील स्मृतीभवनात पार पडणार आहे.

या कार्यशाळेत नवोदित आणि होतकरू उद्योजकांना व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रशिक्षण, शासकीय अर्थसहाय्य योजना, आधुनिक तंत्रज्ञान, व्यवसाय विस्तार, रोजगार निर्मिती आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील संधी यासंदर्भात सखोल मार्गदर्शन मिळणार आहे. बचतगट आणि ग्रामीण उद्योगांना विशेष प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

या उपक्रमामुळे तरुणांना नव्या संधी मिळून उद्योजकतेसाठी योग्य दिशा मिळेल, असा विश्वास शिवामृत दूध संघाचे चेअरमन व शिवरत्न शिक्षण संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी व्यक्त करीत इच्छुक उद्योजकांना या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

# उपजिल्हा रुग्णालय पंढरपुर येथे कॅन्सर डायग्नोस्टीक व्हॅनचा उदघाटन सोहळा संपन्न






**पंढरपुर (कटूसत्य वृत्त):-** असंसर्गजन्य रोग कार्यक्रम अंतर्गत ग्रामीण व शहरी भागातील संशयित कर्करोग रुग्णांची तपासणी व निदान करण्यासाठी अत्याधुनिक सोयींनी युक्त अशा कॅन्सर डायग्नोस्टीक व्हॅनचे उदघाटन माढा मतदारसंघाचे विधानसभा सदस्य अभिजीत पाटील व पंढरपुरचे उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांचे हस्ते करण्यात आले.

सोलापुर जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने यांचे मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रमास अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. क्षिरसागर, जिल्हा रुग्णालयाचे निवासी वैद्यकिय अधिकारी डॉ.एस.पी.कुलकर्णी, जिल्हा मौखिक अधिकारी डॉ. रोहन वायचळ, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकिय अधिक्षक डॉ. महेश सुडके, दंतचिकित्सक डॉ. प्रसन्न भातलवंडे, डॉ. रुचा वैद्य, डॉ. प्रबंध भिसे, डॉ. महेश माने, डॉ. विजयकुमार सरडे, डॉ. रोंगे मॅडम, डॉ. वर्षा काणे मॅडम, डॉ. प्रदीप केचे, डॉ. चारुदत्त शितोळे, डॉ. बालाजी बिराजदार तसेच नर्सोंग स्टाफ, पॅरामेडीकल स्टाफ उपस्थित होते.

सदरील कॅन्सर डायग्नोस्टीक व्हॅनच्या माध्यमातुन बुधवार दिनांक ३० एप्रिल रोजी दिवसभर येणाऱ्या रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. यामध्ये ३० वर्षापुढील एकुण २११ रुग्णांची कर्करोगाची तपासणी करण्यात आली. यापैकी मुख कर्करोगाची तपासणी करण्यात आलेल्या एका मुख कर्करोग संशयित रुग्णांची बायोप्सी घेण्यात आली. ९५ स्त्री रुग्णांची गर्भाशय मुख कर्करोगाची व स्तन कर्करोगाची तपासणी करण्यात आली यापैकी ३५ स्त्री रुग्णांची व्हीआयए तपासणी करण्यात आली.यावेळी आमदार अभिजीत आबा पाटील यांनी उपजिल्हा रुग्णालय पंढरपुरच्या आरोग्य कामकाजाची माहिती घेऊन कौतुक केले.

सदरील कॅन्सर डायग्नोस्टीक व्हॅन ही पंढरपुर शहर व तालुक्यात फिरणार असुन गरजु रुग्णांनी शासनाच्या उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन डॉ. महेश सुडके यांनी यावेळी केले.

# नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करणे हे आमचे कर्तव्य - किसन जाधव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका नागरी स्थानिक स्वराज्य संस्था परिक्षेत्रात अधिसूची विशिष्ट नागरिक सेवा व सुविधा पुरविणे २०२४-२५ अंतर्गत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांच्या सहकायार्तून कार्यसम्राट नगरसेवक नागेश अण्णा गायकवाड आणि किसन जाधव यांच्या विशेष प्रयत्न ातून प्रभाग क्रमांक २२ येथील लिमयेवाडी व अंतर्गत परिसरात १९ लाख ४८ हजार ६३९ रुपये खर्चित ड्रेनेज लाईन कामाचे शुभारंभ करण्यात आले. ड्रेनेज लाईन उद्घाटन सोहळ्याप्रसंगी राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रदेश युवक सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड, नितीन जाधव, दीपक जाधव, किशोर जाधव,अनिल



गायकवाड, अशोक पुजारी जाधव, प्रवीण जाधव, बाळकृष्ण जाधव, अनुप उपाडे, अंबादास गायकवाड, शिवा जाधव, सिद्धार्थ जाधव,कमलाबाई गायकवाड, रेश्मा जाधव, सुनीता मावशी, भाग्यलक्ष्मी ताई, गंगुबाई जाधव, रेखा जाधव, सोनाली जाधव, नसरीन पटेल, रसिका कसबे, सुरेखा गायकवाड, सरस्वती गायकवाड, ज्योती गायकवाड, स्नेहल जाधव, सरिता शर्मा, रेणू गायकवाड, मंगल गायकवाड, विद्या डेविड, गीता जाधव, कोमल उपाडे, गंगाबाई उपाडे, लता जाधव, अनिता माने, नयुमा शेख, रमजान शेख, जुबेदा शेख, मदिना शेख,सुधा गायकवाड, अंबाबाई जाधव आदींच्या उपस्थितीत या ड्रेनेज लाईन कामाचा शुभारंभ करण्यात आला दरम्यान यावेळी बोलताना राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव म्हणाले की प्रभाग क्रमांक २२ येथील नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करणे हे आमचे कर्तव्य आहे आणि ड्रेनेज कामामुळे परिसरातील आरोग्य आणि स्वच्छता निश्चितच सुधारणार आहे या विकास कामासाठी सहकार्य करणाऱ्या प्रभागातील रहिवाशांचे आभार सर्वांच्या एकत्रित प्रयत्न ामुळेच आज या कामाचा शुभारंभ होत आहे आणि लवकरच हे काम पूर्णत्वास जाईल अशी ग्वाही राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांनी दिली. या ड्रेनेज लाईनचे काम पूर्ण झाल्यावर या परिसरातील सांडपाण्याची योग्य व्यवस्था होणार असून प्रभाग क्रमांक २२ येथील नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून येणार आहे या विकास कामामुळेच नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे यावेळी किसन जाधव म्हणाले. या ड्रेनेज लाईन शुभारंभ प्रसंगी प्रभागातील ज्येष्ठ नागरिकांसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कंबर तलाव व परिसराची संपूर्ण स्वच्छता

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपलिकेच्या वतीने दि. ३० एप्रिल, २०२५ आयुक्त यांच्या आदेशानुसार घनकचरा व्यवस्थापन विभाग अंतर्गत भाग क्र. ७ कडील चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांनाकडून सकाळच्या वेळेत कंबर तलाव व परिसराची संपूर्ण झाडलोट व स्वच्छता करण्यात आली. त्यावेळी तलावाच्या संपूर्ण काठावर असलेल्या भागातील कचरा, प्लास्टिक, निर्माल्य इत्यादी काढून स्वच्छता करण्यात आली. तसेच बुकिंग ऑफिस परिसर, झाशीच्या राणीच्या पुतळ्याचा परिसर, खाद्य पदार्थ परिसर या संपूर्ण भागाची स्वच्छता करण्यात आली व संपूर्ण कचरा काढून घंटागाडीव्दारे तेथून सर्व कचरा हलविण्यात आला. या कामकाजामध्ये सातत्य ठेवणेबाबत अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांनी आरोग्य निरीक्षक व मुख्य आरोग्य निरीक्षक यांना जरूर त्या सूचना दिल्या. सदर सफाईचे कामकाज हे ९ ते १०.३० या वेळेत अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी मुख्य सफाई अधिक्षक नागनाथ बिराजदार, मुख्य आरोग्य निरीक्षक नागनाथ मेंडगुळे व संबधित आरोग्य निरीक्षक त्यांचे कर्मचा-यांसह उपस्थित होते.

# खासगी आस्थापनांतील अंतर्गत तक्रार समितीची नोंद करण्यासाठी 'शी बॉक्स पोर्टल'

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळास प्रतिबंध करण्यासाठी अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे अनिवार्य आहे. असे न केल्यास ५० हजार रुपए दंडात्मक कारवाई करण्यात येते. या समितीची नोंद करण्यासाठी आस्थापनांनी https://shebox.wcd.gov.in या संकेतस्थळावर १५ मे पर्यंत करावी, असे आवाहन मुंबई शहर जिल्हा महिला व बालविकास अधिकारी शोभा शेलार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. ज्या खासगी आस्थापनांमध्ये १० किंवा त्यापेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत असतील अशा कार्यालयांना अंतर्गत तक्रार समिती स्थापणे बंधनकारक आहे. https://shebox.wcd.gov.in या संकेतस्थळावर हेडऑफीस रजिस्ट्रेशन या टॅबवर क्लकि करून आवश्यक सर्व माहिती एका क्लकिवर भरता येते, असे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी कळविले आहे.

# जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर यांना राष्ट्रवादीच्या वतीने अभिवादन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ज्ञान-भक्ती-कर्म या त्रिसूत्रीचा मूलमंत्र देत समाजप्रबोधनाच्या माध्यमातून समतावादी विचार जनमानसात रुजवणारे महान तत्त्ववेत्ते, थोर समाजसुधारक, जगद्ज्योती, श्री संत महात्मा बसवेश्वर महाराज यांना जयंतीनिमित्त सोलापूर शहरातील महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या अश्वारूढ पूर्णाकृती पुतळ्यास राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार कार्याध्यक्ष



जुबेर बागवान यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी सोलापूर शहरच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी जिल्हाध्यक्ष संतोष पवार कार्याध्यक्ष जुबेर बागवान ज्येष्ठ नेते हेमंत चौधरी महिला अध्यक्ष संगीताताई जोगदनकर सेवादल अध्यक्ष प्रकाश जाधव जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले अल्पसंख्यांक अध्यक्ष अमीर शेख सांस्कृतिक विभाग अशितोष नाटकर वैद्यकीय अध्यक्ष बसवराज कोळी प्रज्ञासागर गायकवाड मध्य अध्यक्ष आलमिराज आबादिराजे युवक प्रदेश सचिव विशाल बंगाळे सचिन घोडके आदी पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त उपस्थित होते.

# जिल्ह्यात पाच कृषी पर्यटन केंद्रासाठी 5 मे ते 15 मे 2025 दरम्यान अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा प्रशासन व प्रकल्प संचालक (आत्मा), सोलापूर कार्यालयाच्या एकात्मिक पर्यटन विकास आराखड्याअंतर्गत, जिल्ह्यातील स्थानिक संस्थांच्या (विशेषतः शेतकरी उत्पादक कंपन्या, बचत गट, उत्पादक गट इत्यादी) माध्यमातून एकूण 5 पथदर्शी कृषी पर्यटन केंद्रे उभारण्याचे प्रस्तावित आहे. हे प्रस्तावित कृषी पर्यटन केंद्रे पंढरपूर, अक्कलकोट, बार्शी आणि करमाळा या ४ प्रमुख मंदिरांच्या परिसरात प्रत्येकी एक केंद्र, तसेच उजनी धरणाच्या जलाशयालगत च्या गावात एक केंद्र उभारणे अभिप्रेत आहे. ही केंद्रे संबंधित मंदिराच्या सुमारे 10 कि.मी. त्रिज्येतील मुख्य रस्त्यालगत किंवा जवळच्या ठिकाणी असावीत. उजनीच्या बाबतीत जलाशयालगतच्या गावांमध्ये स्थळ असावे.

सी.एल.एफ., सी.एम.आर. सी. यांचा समावेश आहे. प्राप्त अर्जावर जिल्हास्तरीय तांत्रिक समितीमार्फत ठरवलेल्या निकषानुसार निवड केली जाईल.

**अर्ज प्रक्रिया व सविस्तर माहिती :-**

अर्ज व इतर अनुषांगिक माहिती प्रकल्प संचालक (आत्मा), कार्यालय नवीन आरटीओ ऑफिसच्या मागे, विजापूर रोड, सोलापूर येथे उपलब्ध असणार आहे. अजार्चे शुल्क 100 रुपए असून श्री. फुटाणे विक्रम (एटिएम) मो. 9423232569 यांच्या कडून प्राप्त करून घ्यावा. अर्ज वाटपाचा कालावधी दिनांक 5 मे 2025 ते 15 मे 2025 असेल. विहित नमुन्यास परिपूर्ण अर्ज प्रकल्प संचालक (आत्मा), कार्यालयात सादर करण्याची अंतिम तारीख 20 मे 2025 रोजी सायंकाळी 5.30 वाजेपर्यंत असेल, विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत, अशी माहिती प्रकल्प संचालक, आत्मा, सोलापूर यांनी दिली आहे.

**चौकशीची जाहीर नोटीस**

ब.अ.नं.१५११/२०२४
कि.क.अ.क्र.१५१२/२०२४

**संस्थेचे नांवः-अस्मिता बौध्दवालीका मागसवर्गीय वहुउद्देशीय अनाथपालन संस्था सोलापूर.**
**न्यास नों.क्र. :- एफ -२७९६५/सोलापूर**

महादेवी अरविंद निकंबे } **अर्जदार**
**विरूध्द**
कोणी नाही } **गैरअर्जदार**

सदरील अर्ज अर्जदार यांनी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० चे कलम २२ व सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० चे कलम १२-अ अन्वये संस्थेच्या नांव,घटना व नियमावलीत बदल करून मिळणेसाठी अर्ज मा.धर्मादाय उपाआयुक्त साहेब यांच्या कार्यालयात दाखल केलेले आहे. या नोटीसीध्दारे कळविण्यात येते की. या न्यासाचे आपले काही संबंध असल्यास अथवा काही हरकत/तक्रार नोंद करायची असल्यास आपण स्वत: किंवा वकिलामार्फत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत आपली हरकत लेखी स्वरूपात दाखल करावी ३० दिवसानंतर आपले कुठलेही प्रकारच्या हरकतीचा व कुठल्याही बाबींचा विचार केला जाणार नाही.आणि एकतर्फा हुकुम करून सदरचे प्रकरण निकाली काढण्यात येईल.याची कृपया नोंद घ्यावी ही नोटीस माझ्या सहिनिशी व मा.धर्मादाय उपआयुक्त आयुक्त यांचे शिक्यानिशी दि.३०/०४/२०२५ दिली आहे.(टीप.सदरील नोटीस प्रसिध्द करण्याचा खर्च न्यासाच्या अर्जदार यांच्यावरती राहील.)

शिक्का

**अधिक्षक**
**सार्वजनीक न्यास नोंदणी कार्यालय**
**सोलापूर विभाग सोलापूर**

**जाहिर प्रसिध्दीकरण**

नि. ७
दि.कि.अर्ज क्र-३३२/२०२५

**सोलापूर येथील मे.सिव्हील जज सिनिअर डिव्हीजन श्री.व्ही.पी.कुंभार सो यांचे कोर्टात**

१)गुरुसिध्दव्वा मल्लिनाथ गुंडद.वय-६२ वर्षे,धंदा घरकाम.२)शिवलिंग मल्लिनाथ गुंडद वय -४३ वर्षे, धंदा-मजुरी.३)लक्ष्मीपुत्र मल्लिनाथ गुंडद वय-३८ वर्षे,धंदा-मजुरी १ ते ३ सर्वजण रा.सिध्दारुढ मठाजवळ,१०५ रविंद्र नगर, सोलापूर. } **अर्जदार**
**विरूध्द**
कोणीही नाही } **सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं. २ व ३ चे वडील मल्लिनाथ गुडप्पा गुंडद यांचे दि.२०/०९/२०१३ रोजी मयत झालेले आहेत.कै.मल्लिनाथ गुडप्पा गुंडद यांचे नांवे डि व सब डि सोलापूर महानगरपालिका सोलापूर शहर हद्दवाढभागातील तालुका-उ.सोलापूर पैकी कसबे सोलापूर हद्दीतील जुना सर्व्हे नं.२३० यापैकी बाबुराव नगर या नावाने ओळखले जाणारे नगरातील प्लॉट नं.२५ यांचे एकूण क्षेत्र १००० चौ.फुटची इतकी जागा यासी मिळकत क्र.६६०४११ व पेठ ६६ शहर हद्दवाढ विभाग सोलापूर, यातील मयत मल्लिनाथ गुडप्पा गुंडद यांच्या हिश्श्याची ५०० चौ.फुट अश्या वर्णनाची मिळकत आहे.अर्जदार हे मयत मल्लिनाथ गुडप्पा गुंडद यांचे वारसदार असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळणेकामी त्यांनी या न्यायालयाकडे अर्ज केला आहे.

त्याअर्थी यदाकदाचित वरील मिळकतीसंबंध वारस दाखल मिळणेबाबत कोणाची हरकत असेल तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अथवा पुढील नेमलेली तारीख१८/०६/२०२५ रोजी स्वतःअथवा वकिलामार्फत अथवा प्रतिनिधी मार्फत हजर राहून आपले म्हणणे दयावे. मुदतीत कोणाचीही तक्रार अथवा हरकती आल्या नाहीत तर मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारित करतील.हे जाहिर प्रसिध्दीकरण केले.ता.३०/४/२०२५.

**लिपीक** शिक्का **सहा.अधिक्षक दिवाणी न्यायाधीश**
**वरिष्ठ स्तर,सोलापूर**

**जाहिर प्रसिध्दीकरण**

दि.कि.अर्ज क्र.२११/२०२५

**सोलापूर येथील मे.सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन सौ.चव्हाण सो यांचे कोर्टात**

१)श्री.अशोक सिद्राया बिराजदार वय ५३ वर्षे,धंदा-नोकरी,रा.प्लॉट नं.१,भाग्यश्री नगर, आकाशवाणी केंद्राजवळ, सोलापूर.२)श्री.गजानन सिद्रामप्पा बिराजदार वय ५०वर्षे,धंदा-नोकरी,रा.फ्लॅट नं.बी-१००९. स्टारगेझ,सर्व्हे नं.७६ ते ८९,विंडमईल्सजवळ,बावधन बु।।, पुणे शहर, पुणे-४११०२१.३)मल्लिकार्जुन सिद्राया बिराजदार वय ४८वर्षे,धंदा नोकरी,रा.प्लॉट नं.१,भाग्यश्री नगर,आकाशवाणी केंद्राजवळ,सोलापूर.४) रेणुका मोहन बिराजदार वय ५१वर्षे,धंदा घरकाम,रा.फ्लॅट नं.१०३,साई दर्शन अपार्टमेंट,वीरा रेड्डी कॉलनी, सीके गार्डनसमोर,नचरम,उप्पल,रंगारेड्डी,आंध्र प्रदेश-५०००७६.५)श्रेयश मोहन बिराजदार वय २९वर्षे,धंदा-नोकरी, रा.फ्लॅट नं.१०३.साई दर्शन अपार्टमेंट,वीरा रेड्डी कॉलनी,सीके गार्डनसमोर,नचरम,उप्पल,रंगारेड्डी,आंध्र प्रदेश-५०००७६.६)विद्या मोहन बिराजदार लग्नानंतरचे नांव विद्या सतीश वय २७वर्षे,धंदा-नोकरी,रा.घर नं.१९-५-३७७/२.साई निलय,सिध्देश्वर कॉलनी,नवबाद,बिदर कर्नाटक-५८५४०१ (७)अनिता सूर्यकांत वागदरी वय ३८ वर्षे, धंदा घरकाम, रा.लक्ष्मी निवास,गणेश हौसिंग सोसायटी,स.नं.३२,चिंतामणी विद्यालयाजवळ,आंबेगांव बुद्रुक, पुणे-४११०४६.८)ललिता नागनाथ बिराजदार वय ४३ वर्षे, धंदा घरकाम,रा.१७,रविंद्र नगर,सोलापूर } **अर्जदार**
**विरूध्द**
कोणीही नाही } **सामनेवाला**

ज्याअर्थी,अर्जदार यांनी सदरचा अर्ज वारसा दाखला मिळणेकरिता दाखल केलेला आहे. सिद्राय्या उर्फ सिदराया कलप्पा बिराजदार हे अर्जदार नं.१ ते ३ यांचे जनक पिता होते,तर अर्जदार नं.४ यांचे सासरे होते,तर अर्जदार नं.५ ते ८ यांचे आजोबा होते.सिद्राय्या उर्फ सिदराया कलप्पा बिराजदार यांचे दि.१०/०९/२०१४ रोजी मार्कडेय सोलापूर सहकारी रुग्णालय, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर येथे निधन झाले आहे. सिद्राय्या उर्फ सिदराया कलप्पा बिराजदार यांची पत्नी, तर अर्जदार नं. १ ते ३ यांचे जनक माता, अर्जदार नं. ४ यांची सासू तर अर्जदार नं.५ ते ८ यांची आजी नामे पुतळाबाई सिद्राय्या बिराजदार हिचे दि. १८/०१/२०१५ रोजी प्लॉट नं.१,भाग्यश्रीनगर,आकाशवाणी केंद्राजवळ,सोलापूर येथे निधन झाले आहे,तर सिद्राय्या उर्फ सिदराया कलप्पा बिराजदार यांचा मुलगा,तर अर्जदार नं.१ ते ३ यांचा भाऊ,अर्जदार नं.४ हिचे पती,तर अर्जदार नं.५ व ६ यांचे जनक पिता,तर अर्जदार नं.७ व ८ यांचे मामा नामे मोहन सिदराया बिराजदार यांचे दि. २६/०१/२०२३ रोजी साई कृष्णा सुपर स्पेशालिटी न्युरो हॉस्पिटल, नचरम, काचीगुडा(बरकाथपुरा),अवस्पेट,हैद्राबाद राज्य तेलंगणा येथे निधन झाले आहे. तर सिद्राय्या उर्फ सिदराया कलप्पा बिराजदार यांचा मुलगा.तसेच अर्जदार नं.१ ते ३ यांची बहिण,अर्जदार नं.४ हिची नणंद,तर अर्जदार नं. ५ व ६ यांची आल्या,तर अर्जदार नं.७ व ८ यांची जनक आई नामे शिवम्मा बसु गंगदे हीचे दि.१५/१०/१९८६ रोजी भारतरत्न इंदिरानगर झोपडपट्टी, उत्तर सदर बझार,सोलापूर येथील राहत्या घरी निधन झाले आहे. सिद्राय्या उर्फ सिदराया कलप्पा बिराजदार यांच्या मृत्युपश्चात अर्जदार हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या मयत सिद्राय्या उर्फ सिदराया कलप्पा बिराजदार यांचे नांवे शहर सोलापूर येथे खालील मिळकत आहे. जिल्हा व उपजिल्हा सोलापूर पैकी तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे यत्नाळ येथील शेतजमीन यासी गट नं.२२/२/अ याचे क्षेत्र ०२ हेक्टर ०२ आर यासी आकार रु. २= २० पैसे यासी चतु:सिमा- पूर्वेस- राजशेखर हिरेमठ यांची शेतजमीन, दक्षिणेस-सुभाष भिमाशंकर बिराजदार यांची शेतजमीन, पश्चिमेस भिमाशंकर हिरापुरे यांची शेतजमीन, उत्तरेस बाबय्या स्वामी यांची शेतजमीन, सिद्राय्या उर्फ सिदराया कलप्पा बिराजदार यांचे पश्चात अर्जदार हेच एकमेव त्यांचे जवळचे व कायदेशीर वारसदार आहेत, त्यांचेशिवाय अन्य कोणीही वारसदार नाहीत, त्यामुळे अर्जदार यांनी त्यांचे नांवे वारसा दाखला मिळणेकरिता सदर अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी जर कोणास वरील अर्जदार यांच्या नावाने वारसा दाखला देण्यासंबंधी कांही म्हणणे, हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३ दिवसांचे आत अथवा नेमलेली तारीख १३/६/२०२५ रोजी मे.कोर्टात हजर राहावे.तसे न झाल्यास अर्जदार यांच्या नावाने वारस प्रमाणपत्रास कोणाची काही हरकत नाही असे समजून अर्जदार यांचे नांवे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.
ही जाहीर नोटीस माझ्या सहीनिशी व मे.कोर्टाच्या शिक्यानिशी दिली असे.ता.३०/४/२०२५.

**लिपीक** शिक्का **हुकूमावरून सहा.अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधिश व.स्तर सोलापूर**